सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०८ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३२८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# इराण युद्धामुळे जग 'गॅस'वर, पण भारताची चिंता मिटली

## २ देश ठरणार संकटमोचक, सर्वसामान्यांना दिलासा

नवी दिल्ली : मध्य पूर्वेतील तणावामुळे तेल आणि गॅस पुरवठ्याचे संकट जगासमोर उभे राहिले आहे. भारतासमोरही गॅस पुरवठ्याचं संकट तीव्र होत असताना दोन देशांनी मदत करण्यास पुढाकार घेतला आहे. अतिरिक्त गॅस पुरवठ्यासाठी त्यांनी ऑफर दिल्याचे सरकारी सुत्रांकडून समोर येत आहे.

इराणवर इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यांनंतर पश्चिम आशियात तणाव वाढला आहे. यामुळे भारत ासह अनेक देशांना कच्च्या तेल आणि गॅसच्या पुरवठ्यात अडचणी येऊ शकतात. होर्मुज सामुद्रधुनीमधून पुरवठा बाधित होण्याची शक्यता लक्षात घेता भारत त्याच्या ऊर्जा सुरक्षेसाठी इतर देशांचाही पर्यायांचा विचार करत आहे. सरकारी स्रोतांच्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलिया, कॅनडा सारख्या अनेक देशांनी भारताला अतिरिक्त गॅस पुरवठ्याची ऑफर दिली आहे.

**भारताला पुरवठा करणारे देश**

भारत आपल्या गरजेनुसार कच्चे तेल आणि गॅस अनेक देशोंमधून खरेदी करतो. त्यामध्ये रशिया, पश्रि्चम आफ्रिका, अमेरिका, आखाती देश यांचा समावेश आहे. भारताने अलिकडच्या काळात अमेरिका आणि संयुक्त अरब अमीरात (यूएई) सारख्या भागीदार देशांसोबत नवीन ऊर्जा पुरवठा व्यवस्था केली आहे. याचा हेतू दीर्घकालीन स्थिर पुरवठा सुनिश्रि्चत करणे आहे. गेल्या दहा वर्षात भारताने आपल्या तेल पुरवठ्याचे स्रोत २७ देशांपासून वाढवून ४० देशांपर्यंत वाढवले आहेत जे सहा खंडामध्ये पसरलेले आहे.

सूत्रांनी सांगितले की, होमुर्ज सामुद्रधुनी भारतासाठी महत्त्वाची आहे. जेथून भारताला मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा होतो पण भारत कच्च्या तेलाच्या पुरवठ्याची आता कोणत्याही एक समुद्री मार्गावर अवलंबून नाही. कच्चे तेल इतर मार्गांनी होम्रुझ सामुद्रधुनीपेक्षा जास्त तेल आयात केले जाते. त्यामुळे ते अद्याप प्रभावित झालेले नाहीत.

**युद्ध आणि जगावर तेल संकट**

अमेरिका इस्रायल इराण यांच्यातील संघर्ष ७ दिवसांपासून सुरू आहे. सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने



आक्रमक भूमिका घेत होमुर्झ सामुद्रधुनी बंद केली होती. त्याचे भारतासह जगावरही परिणाम दिसून येत आहे. तेलाचे दर प्रति बॅरल वाढले आहेत. तर गॅस पुरवठ्याची समस्या अनेक देशांना भेडसावू लागली आहे. देशात तर एलपीजी पीएनजीची दरवाढही करण्यात आली आहे. पण आता कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया यांची मदत महत्त्वाची ठरु शकते. ज्यामुळे गॅस पुरवठा सुरळीत करण्यास मदत होईल.

## भूकंपाच्या धक्क्याने राजस्थान हादरले

जयपूर : शनिवार ७ मार्च रोजी सकाळी राजस्थानमध्ये सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ३.५ इतकी होती. मिळालेल्या माहितीनुसार हा भूकंप सिकर जिल्हा आणि आसपासच्या भागात सर्वात जास्त जाणवला. तथापि, सौम्य भूकंपामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा नुकसान झालेले नाही.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, भूकंपाचे केंद्र जयपूरच्या वायव्येस सुमारे ६९ किलोमीटर अंतरावर, सुमारे पाच किलोमीटर खोलीवर होते. सकाळी ६:३० च्या सुमारास आलेला हा भूकंप फक्त काही सेकंद टिकला.

वृत्तानुसार, खाटूश्यामजी, पलसाणा, धिंगपूर आणि सीकर जिल्ह्यातील आसपासच्या भागात लोकांना सौम्य भूकंपाचा धक्का जाणवला. सुमारे एक–दोन सेकंद चाललेल्या या भूकंपामुळे लोक घराबाहेर पडले. पलसाणा परिसरातील अनेक रहिवाशांनी सांगितले की भूकंपाच्या वेळी त्यांच्या घरांचे दरवाजे आणि खिडक्या हादरल्या.

## देशभरात गॅस सिलेंडरच्या किंमतीत वाढ

### घरगुती आणि कमर्शिअल दोन्हीचे दर वाढले

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ मार्च :** देशभरात घरगुती आणि व्यावसायिक दोन्ही गॅस सिलेंडरच्या दरात आज, शनिवारपासून (७ मार्च २०२६) दरवाढ करण्यात आली आहे. घरगुती वापराचा १४.२ किलोच्या सिलेंडरचे दर ६० रुपयांनी वधारले असून व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या किंमतीत ११५ रुपयांची वृद्धी करण्यात आली आहे.

देशात घरगुती स्वयंपाक गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीतही ११५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीचा थेट परिणाम हॉटेल, रेस्टॉरंट आणि लहान व्यावसायिक आस्थापनांवर होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीमध्ये १४.२ किलो घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत ८५३ रुपयांवरून ९१३ रुपये झाली आहे. मुंबईमध्ये घरगुती सिलेंडरची नवीन किंमत ९१२.५० रुपये झाली असून पूर्वी ती ८५२.५० रुपये होती. तर चेन्नईमध्ये किंमत ८६८.५० रुपयांवरून ९२८.५० रुपये झाली आहे. हे सुधारित दर आजपासून लागू झाले आहेत.

यासोबतच व्यवसायांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १९ किलो वजनाच्या व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीतही मोठी वाढ झाली आहे. दिल्लीमध्ये गॅस सिलेंडरची किंमत १७६८.५० रुपयांवरून १८८३ रुपये झाली आहे. तर मुंबईमध्ये १७२०.५० रुपयांवरून १८३५ रुपये झाली आहे. तसेच कोलकात्यात सिलेंडरचे दर १८७५.५० रुपयांवरून १९९० रुपये झाले असून चेन्नईमध्ये १९२९ रुपयांवरून २०४३.५० रुपये झाली आहे.यापूर्वी एप्रिल २०२५ पासून घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे या ताज्या दरवाढीचा घरगुती ग्राहक तसेच व्यावसायिक वापरकर्त्यांवर मोठा आर्थिक परिणाम होण्याची शक्यता आहे.

## आज मेट्रोची 'कमान' महिलांच्या हाती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ मार्च :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (चचठउ) कडून एक विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. मुंबई मेट्रो लाईन ३ (अ‍ॅक्वा लाईन) वरील मरोळ नाका आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (उडचढ) ही दोन महत्त्वपूर्ण मेट्रो स्थानके ८ मार्च २०२६ रोजी पूर्णपणे महिला कर्मचाऱ्यांकडून संचलित केली जाणार आहेत.



शहरी वाहतूक क्षेत्रामध्ये महिलांचा वाढता सहभाग आणि महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या दोन्ही स्थानकांवरील दैनंदिन कामकाजामध्ये स्थानक नियंत्रण, तिकीटिंग, प्रवासी सहाय्य, सुरक्षा व्यवस्था, देखभाल सहाय्य आणि हाऊसकीपिंग अशा विविध जबाबदाऱ्या महिलांकडे असतील. दिवसभरातील वेगवेगळ्या शिफ्टमध्ये मिळून एकूण ८५ महिला कर्मचारी या स्थानकांचे कामकाज सांभाळतील.

याशिवाय, अ‍ॅक्वा लाईनच्या संचालनामध्ये २७ महिला ट्रेन ऑपरेटर्स (मेट्रो पायलट) महत्त्वाची भूमिका बजावत असून त्या नियमितपणे मेट्रो गाड्यांचे संचालन करत आहेत. एकूणच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमध्ये १,३८८ महिला कर्मचारी विविध स्तरांवर कार्यरत आहेत. यामध्ये कार्यालयीन कर्मचारी तसेच ऑपरेशन्स, तिकीटिंग, हाऊसकीपिंग आणि सुरक्षा सेवांमध्ये कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## अमेरिका रिफंड करणार १५ लाख कोटी, ४५ दिवसांचा रिटर्न कालावधी, भारतालाही होणार फायदा

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** इराणसोबत युद्ध सुरू असताना ट्रम्प प्रशासनाला टॅरिफच्या रिफंड ४५ दिवसांमध्ये करणे आवश्यक आहे. यासंबंधी एक नवीन सिस्टिम विकसित करण्यात येत आहे. या टॅरिफ रिफंडमध्ये भारतीय निर्यातकर्त्यांनाही फायदा होणार आहे.

इराणच्या युद्धात दरम्यान ट्रम्प प्रशासनाला दोन मोठे धक्के बसले आहेत. एकतर त्याला युद्धावर मोठा खर्च करावा लागतोय, आणि त्याचबरोबर अवैध ठरवलेले टॅरिफ कमी होण्याबरोबरच आता ४५ दिवसांच्या आत साधारण १५ लाख कोटी रुपये परत करणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या कस्टम आणि सीमा सुरक्षा विभागाने परतफेडीसाठी एक नवीन प्रणाली विकसित केली आहे, ज्यामुळे संबंधित देशांना एकाचवेळी या पैशांची परतफेड करता येईल. याचा फायदा नंतर भारतीय निर्यातकांनाही होईल. टॅरिफ ५० टक्क्यांपेक्षा कमी होऊन १५ टक्क्यांपर्यंत आला म्हणून हा फायदा होईल.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## औसा येथे १४ व १५ मार्च ला लातूर ग्रंथोत्सवाचे आयोजन : वंदना काटकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने औसा येथे दि. १४ व १५ मार्च २०२६ रोजी लातूर ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर यांनी दिली.

लातूर ग्रंथोत्सव २०२६ च्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी जिल्हा ग्रंथालय कार्यालयात आयोजित ग्रंथालय पदाधिकारी ,कार्यकर्त्यांच्या बैठकीत काटकर बोलत होत्या. दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृती वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम पार पडणार आहेत. यामध्ये ग्रंथदिंडी, कथाकथन, कवी संमेलन, उत्कृष्ट वाचक सत्कार, ग्रंथ प्रदर्शन, परिसंवाद अशा उपक्रमांचा समावेश आहे. ग्रंथोत्सवात ग्रंथ वितरक, प्रकाशकांसाठी ग्रंथविक्रीसाठी स्टॉलही उपलब्ध करुण देण्यात येणार आहेत. या ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचकांना दर्जेदार ग्रंथ उपलब्ध व्हावीत हाही यामागचा हेतू आहे. दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल, कर्मचाऱ्यांनी पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे सांगून वंदना काटकर यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी नागरिकांनीही या ग्रंथोत्सवात आपला सक्रिय सहभाग नोंदवून ग्रंथोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे. या बैठकीस जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, ग्रंथालय निरीक्षक राजेंद्र कोरे, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील यांच्यासह ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.



## विविध वृत्त...

### सहकार मंत्री नामदार पाटील यांच्याकडून रेड्डी परिवारांचे सांत्वन

**अहमदपूर :** येथील स्व. स्वातंत्र्य सैनिक तथा माजी आमदार निवृत्तीराव रेड्डी यांचे सुपुत्र, यशवंत विद्यालयाचे विज्ञान विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक विजय निवृत्तीराव रेड्डी यांचे दि.६ रोजी शुक्रवारी सकाळी १० .३०वाजता राहत्या घरी वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांचा अंत्यविधी शनिवारी पार पडला. या अंत्यविधीस राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे उपस्थित होते. त्यांनी विजय रेड्डी यांच्या प्रति शोक भावना व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच त्यांनी वैभव रेड्डी परिवाराचे सांत्वन केले.

### जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची वार्षिक सभासद नोंदणी अभियान सुरु

**लातूर:** लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची सन २०२६ या वर्षासाठीची सभासद नोंदणी सुरु झाली आहे. लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक शासनमान्य ग्रंथत्तलयांनी आपापल्या तालुक्यातील तालुका प्रतिनिधीकडे दि.२५ मार्च २०२६ रोजी पर्यंत संस्था व व्यक्ती सभासद नोंदणी उदगीरा-सुर्यकांत शिरसे,राम मोतीपवळे,जळकोट-यशवंत कुलकर्णी, अशोक कारभारी,शिरुर अनंतपाळ-काशिनाथ बोडके, देवणी- अनिल पाटील,निलंगा-गुप्तलिंग स्वामी, औसा-प्रभाकर कापसे, लातूर-राम मेकले, हुतात्मा स्मारक, लातूर, चाकूर-हावगीराव बेरकीळे, तुकाराम सुगावकर, अहमदपूर-अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, रेणापूर- सिध्देश्वर उकिरडे, या तालुकाप्रतिनिधींकडे आपली वार्षिक ग्रंथालय सभासद नोंदणी वरील प्रमाणे करावी,असे आवाहन जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

### वाणिज्य शाखेमध्ये उपलब्ध करिअरच्या संधीचा लाभ घ्या

**औराद शहाजानी :** वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना सेवा क्षेत्रात करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन अध्ययनासोबतच तंत्रज्ञान व कला-कौशल्ये आत्मसात करावीत असे प्रतिपादन अजित कुलकर्णी (देशपांडे स्किल अकादमी, हुबळी, कर्नाटक) यांनी केले. येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट सेल आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य विद्याशाखेतील करिअर संधी, मार्गदर्शन व संवाद'' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.विनोद चिंते, करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ.रितेश व्यास, डॉ.सत्यशीला जोंधळे, डॉ.सचिन हंचाटे आता उपस्थित होते. यावेळी कुलकर्णी यानी माहिती-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.), बँकिंग - फायनान्स इत्यादीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा सुयोग्य व मर्यादित वापर करून आपला अधिकाधिक वेळ हा वाचन, लेखन, चिंतन यामध्ये घालवावा. यापुढील काळात विद्यार्थ्यांना केवळ पदवी अथवा पदव्युत्तर पदवी संपादन करून रोजगार - स्वयंरोजगार मिळणार नसून यासाठी त्यांनी जागरूक राहून जिद्दीने, प्रामाणिक व सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रितेश व्यास यांनी केले. अतिथींचा परिचय डॉ.सत्यशीला जोंधळे यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ.विनोद चिंते यांनी केले. मारोती पवार यांच्यासह वाणिज्य व संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# महिलांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणार तरी केव्हा.. ?

- महिला पदाधिकाऱ्यांचा कारभार आजही 'पती'च पाहतात
- २१ व्या शतकातही महिलांना सोसावी लागतेय घुसमट.
- महिलांच्या आरक्षणाला दिली जातेय 'कवडीमोल' किंमत..!

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. ०७ मार्च :** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी पन्नास टक्के आरक्षण देण्यात आलेले असले तरी बहुतांश ठिकाणी महिलांकडे असलेल्या संविधानिक पदाचा कारभार त्यांचे पतीच पाहताना दिसतात. जागतिक महिला दिन साजरा करत असतानाही हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे कितीही कर्तृत्व असले तरी महिलांना २१ व्या शतकातही मानसिक घुसमट सोसावी लागते. त्यामुळे वास्तवात महिलांच्या आरक्षणाला 'कवडीमोल ' किंमत दिली जात असल्याचे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते.

दरवर्षी ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा केला जातो.आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे सरपंच पदापासून ते नगराध्यक्ष - महापौर पदावर आज महिला भगिनी विराजमान झालेल्या पाहायला मिळतात. खऱ्या अर्थाने हा महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मानच म्हटला पाहिजे. पुरुष प्रधान संस्कृतीत महिलांना सातत्याने दुय्यम स्थान दिले जात असल्याचे पाहायला मिळते. आरक्षणामुळे महत्वाच्या पद-ावर महिलांची निवड होत असली तरी प्रत्यक्षात त्यांचा कारभार पती किंवा अन्य कोणी तरी पाहत असल्याचे चित्र बहुसंख्य ठिकाणी पाहायला मिळते.



निसर्गाने महिलांना पुरुषांपेक्षाही अधिक सहनशिलता, संयम दिलेला आहे. महिलांएवढी सहनशीलता आणि संयम जगातला कोणताही पुरुष बाळगू शकत नाहीत, हे वास्तव आहे. त्यामुळे अंगी कर्तृत्व, क्षमता असूनही सुशिक्षित महिलांना सातत्याने पुरुषी अहंकाराला बळी पडावे लागत असल्याचे पदोपदी पाहायला मिळते. याचेच मूर्तिमंत उदाहरण नुकतेच लातूरमध्ये सर्वांसमोर आले आहे. लातूरच्या नूतन महापौर पद-ावर जयश्री सोनकांबळे यांची निवड झाली आहे. महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यापासून त्यांचे पती नेहमी सोबत असतात. कोणताही अधिकार नसताना ते सतत महापौरांसोबत असतात त्यामुळे महापौरांना अपात्र ठरविण्यात यावे,अशी मागणी मनपातील विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मनपा आयुक्तांकडे केल्याचे सर्वज्ञात आहे. असा प्रकार केवळ लातूरातच हडतोय असे नाही. राज्यात बहुतांश महिला पदाधिकारी असणाऱ्या ठिकाणी हे सर्रास घडत असल्याचे दिसून येते.

संविधानाने महिलांना काही अधिकार प्रदान केले असले तरी त्याचा वापर आजही महिला भगिनींना खुल्या दिलाने करता येत नाही. आज महिलांनी सर्वच क्षेत्र पादाक्रांत केली आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिला काकणभर सरसच असतात, असे म्हणणेही धाडसाचे ठरणार नाही. मात्र, पुरुष आपण कुठेतरी महिलांपेक्षा कमी पडू शकतो हे मान्य करताना दिसत नाहीत, हेही वास्तव आहे. स्वतःची चूक कबूल करण्यात कोणताही कमीपणा नसतो, असे म्हटले जाते. परंतु या मुद्द्याकडे गांभीर्याने पहिले जाताना दिसत नाही. खऱ्या अर्थाने जागतिक महिला दिन साजरा करायचा असेल तर कर्तृत्ववान महिलांच्या कर्तृत्वावर डोळे झाकून विश्र्वास ठेवलाच पाहिजे. एखाद्या ठिकाणी महिला कमी पडत असेल तर त्यांना तेवढ्यापुरते मार्गदर्शन करण्याची तयारी पुरुष मंडळींनी ठेवली पाहिजे. असे झाले तर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला पदाधिकारी आपल्या पदाचा वापर व्यवस्थितरीत्या करू शकतील आणि महिलांचे आरक्षण वास्तवात येण्यास मौलिक मदत होईल. पाहू या, याची सुरुवात कधीपासून होतेय ते.

## शैक्षणिक पंढरीचे जनक काळाच्या पडद्याआड : डॉ. संजय जमदाडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** लातूरचे वैभव व शैक्षणिक पंढरीचे जनक प्राचार्य डॉ. जे. एम. वाघमारे सर यांच्या निधनाने लातूरकरांचे व साहित्य क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले आहे असे मत डॉ. संजय जमदाडे यांनी व्यक्त केले. नाना नानी वाकर्स ग्रुप च्या वतीने वाहण्यात आलेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी डॉ. संजय जमदाडे यांनी प्राचार्य डॉ. जे.एम. वाघमारे सर यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी एक कविता सादर केली. तसेच विधीज्ञ श्री शिरीष दहिवाल यांनी सरांच्या काही आठवणींना उजाळा दिला .पारस सेठ चापसी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बापू कुंभार, महेश बावगे, नंदकुमार बनाळे, महेश खेकडे, विजय वारद, विकास सावळसुरे, निळकंठ स्वामी, हुसेन शेख, दत्तात्रय गायकवाड,उमाकांत बट्टेवार, अजय घाळे, निलेश शिंदे, विलास भूमकर, अभिजीत शिरसाट, अशोक कांबळे, राजू जाधव आदी उपस्थित होते.



## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे 'टेक्स्टबुक ऑफ सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील ''टेक्स्टबुक ऑफ सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी'' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हे पुस्तक इंगोले पब्लिकेशन यांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आले आहे.

फार्मसी अभ्यासक्रमातील सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी हा विषय सार्वजनिक आरोग्य, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, रोगप्रतिबंधक उपाययोजना, लसीकरण, महामारीशास्त्र, आरोग्य शिक्षण, पोषण, पर्यावरण व स्वच्छता, माता-बाल आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण, औषधांचा तर्कसंगत वापर, फार्माकोव्हिजिलन्स, तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांबाबत सखोल माहिती देणारा आहे. प्रस्तुत पुस्तकात या सर्व घटकांचे सुलभ, समजण्यास सोपे आणि परीक्षाभिमुख स्वरूपात विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

पुस्तकात अद्ययावत आकडेवारी, तक्ते, आलेख, महत्त्वाचे मुद्दे, संभाव्य प्रश्नोत्तरे, एकाधिक निवड प्रश्न, तसेच अभ्यासासाठी उपयुक्त अशा टिप्स समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ परीक्षा तयारीसाठीच नव्हे तर फार्मसी स्पर्धा परीक्षा व व्यावसायिक प्रात्यक्षिक ज्ञानासाठीही उपयुक्त ठरणार आहे. फार्मसी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करून त्यांना आरोग्य व्यवस्थेतील जबाबदार घटक म्हणून सक्षम बनविण्याचा हेतू या पुस्तकामागे आहे.

या पुस्तकाचे लेखक प्रा. महेश मानके, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. शशिकांत ढवळे व डॉ. सिध्देश्वर पाटील हे असून त्यांनी आपल्या शैक्षणिक व अध्यापन अनुभवाच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार पुस्तक उपलब्ध करून दिला आहे.

## गंजगोलाईत अतिक्रमण हटाव मोहीम; मनपा व पोलिसांची संयुक्त कारवाई, सहा हातगाडे जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** शहरातील गंजगोलाईत लातूर शहर महानगरपालिका व पोलिसांच्या वतीने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली.यात ६ हातगाडे व वजन काटे जप्त करण्यात आले.

गंजगोलाई ही लातूरची प्रमुख बाजारपेठ आहे.विशेष म्हणजे या परिसरातून असंख्य रस्ते जात असल्याने वाहतूकही सुरू असते. सध्या रमजान व गुढीपाडवा यासारखे मोठे सण तोंडावर आलेले असल्याने बाजारपेठेत वर्दळ आहे. अतिक्रमणे वाढल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. याशिवाय खरेदीसाठी बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे मनपाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे.



गुरुवारी मनपा व पोलिसांच्या वतीने संयुक्त कारवाई करण्यात आली. असंख्य फेरीवाल्यांनी रस्ते व्यापल्याने त्यांना हटविण्यात आले. वारंवार सूचना करूनही हातगाडे हटत नसल्याने ६ हातगाडे व वजन काटे पोलिस व मनपाच्या पथकाने जप्त केले.

या कारवाईत गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड, वाहतूक पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे,उपनिरीक्षक बाबू गीते, माधव केंद्रे मनपाचे क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी, मुख्य स्वच्छता निरीक्षक शिवराज शिंदे, अतिक्रमण विभाग प्रमुख संतोष रणदिवे, सी झोनचे सर्व स्वच्छता निरीक्षक, यांच्यासह मनपा व पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

व्यावसायिकांनी रस्त्यावर अतिक्रमणे करू नयेत.रहदारीस अडथळा होईल अशा ठिकाणी हातगाडे उभे करू नयेत. खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने हातगाडे उभी करू नयेत. महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे.अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास दंडात्मक व जप्तीची कारवाई करण्यात येईल,असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# स्वकर्तृत्वावर आणि अपार मेहनतीच्या बळावर यशस्वी झालेली लातूरची कन्या : डॉ. अक्षया जैन

**महिला दिन विशेष...**

**सोमेश श्रीधर स्वामी**

लातूरची भूमी खरोखर सोन्या-ची भूमी असल्याचे अनेक बाबींनी स्पष्ट झाले आहे. राजकीय, औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात लातूरच्या मंडळींनी आपले नेतृत्व आणि कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यातच आता आणखी एका तेजस्वी व्यक्तिमत्वाची भर पडली आहे. सौंदर्य आणि केसांच्या उपचारात अक्षरशः आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्युच्च दर्जाची सेवा देणाऱ्या डॉ. अक्षया जैन, असे यशस्वी उद्योजिका कम वैद्यकीय व्यावसायिकांचे नाव आहे.

डॉ.अक्षया जैन यांचा जन्म लातूर शहरात झाला असून त्यांच्या मातोश्री सौ. अमृता नितीनचंद्र कंगळे या लातुरातील ख्यातनाम सौंदर्यतज्ञ आहेत. लातूरच्या औसा रोडवरील 'अमृताज ब्युटी क्लिनिक'च्या संचालिका म्हणूनही त्यांची विशेष ओळख राहिली आहे. डॉ.अक्षया जैन यांचे पिताश्री नितिनचंद्र कंगळे यांनी पाटबंधारे विभागात उप कार्यकारी अभियंता म्हणूनही उत्कृष्ट कार्य केले आहे. घरातील वातावरण संस्कृती संवर्धनात्मक असल्याने डॉ. अक्षया जैन यांना अगदी लहानपणापासूनच संस्कृती सोबतच सौंदर्य क्षेत्राबद्दलचे ज्ञान मिळत गेले. जे जे नवीन आहे, त्यातल्या त्यात आजच्या काळाला अनुसरून सौंदर्य आणि केसांच्या आरोग्यासंदर्भात उच्च स्तरीय उपचाराचे प्रशिक्षण त्यांनी संपादन केले आहे.



पुण्यातील प्रथितयश भागात त्यांचे स्वतःचे अद्यावत ,सर्वसोयी सुविधांनी परिपूर्ण क्लिनिक आहे. आपल्या क्लिनिकच्या माध्यमातून त्या मागच्या अनेक वर्षांपासून उत्कृष्ट सेवा देण्याचे काम करत आहेत. आपण ज्या क्षेत्रात कार्य करतो, ते कार्य त्या क्षेत्रातील अत्युच्च असले पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन डॉ. अक्षया जैन आपल्या आरोग्यसेवेचा उपक्रम यशस्वीपणे चालविण्याचे काम करत आहेत. आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील महिलांचा यथायोग्य सन्मान करण्याचे काम विविध पातळीवर केले जात आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूरच्या या कन्येने स्वकर्तृत्वावर पुण्यासारख्या महानगरात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे, ही बाब तमाम लातूरकरांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे. डॉ.अक्षया जैन यांच्या या यशामागे अर्थातच त्यांचे आई वडील नितिनचंद्र कंगळे - सौ. अमृता कंगळे यांचा सिंहाचा वाटा आहे. कोणत्याही माता-पित्याला आपल्या कांहीच अभिमान वाटावा असेच कार्य डॉ. अक्षया जैन यांच्याकडून सातत्याने होत आहे.

कोणत्याही व्यक्तीने आपल्या जीवनात एक उच्च ध्येय घेऊन त्या ध्येयाच्या परिपूर्तीसाठी सर्वतोपरी कष्ट, मेहनत करण्याची तयारी दर्शविल्यास यश त्याच्या पायाशी लोळण घेते,असे म्हटले जाते. डॉ.अक्षया जैन यांच्या एकंदर प्रगतीवरून त्याची सत्यता पटते. उत्कृष्ट वैद्यकीय व्यावसायिक म्हणून तर आज त्यांचे सर्वत्र नाव झालेलेच आहे. त्यांच्याकडे उपचार घेणाऱ्यांची यादीही खूप मोठी आहे. हिंदी - मराठी अभिनय विश्र्वातील अनेक दिग्गज कलाकारही त्यांच्याकडे नियमित उपचार घेतात. त्यामुळे विविध क्षेत्रातील दिग्गजांशी डॉ. अक्षया जैन यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे, निकटचे संबंध आहेत, हे पाहून प्रत्येक लातूरवासियांचे मन अभिमानाने भरून आल्याशिवाय राहणार नाही. आपल्या लातूरच्या भूमीत जन्मलेली एक कन्या आपले एवढे मोठे अस्तित्व, साम्राज्य निर्माण करू शकली यातच सर्व काही आले, असे म्हटल्यास ते फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही.

स्किनटिलेटिंग क्लिनिक्स, क्रोमोकोस्मो इन्स्टिट्यूट ऑफ एस्थेटिक्स , ट्रायकॉलॉजी अँड न्यूट्रिशन ( सीआयएटीएन )पुणे च्या संस्थापक डॉ. अक्षया जैन यांना नुकतेच ' एस्थेटिक मेडिसीन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील लीडर ' हा पुरस्काराने देऊन केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे. डॉ. अक्षया जैन यांनी मेडिकल ट्रायकॉलॉजी, क्लिनिकल कॉस्मेटॉलॉजीमध्ये पदव्युत्तर डिप्लोमा प्राप्त केला आहे. तर पॅरिसमधून परमनंट मेक अप चा डिप्लोमा मिळवला आहे. स्तनाच्या कर्करोगासाठी एरोला पिग्मेंटेशनमध्ये मास्टर्स डिग्री संपादन केली आहे. तसेच हॉलंडमधून चट्टे आणि केसांच्या रेषांच्या रंगद्रव्यात मास्टर्स डिग्री मिळवली आहे. सीआयएटीएन ही स्किल इंडिया, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयांतर्गत नोंदणीकृत असलेली संस्था आहे. या संस्थेअंतर्गत एस्थेटिक मेडिसीन , ट्रायकॉलॉजी आणि क्लिनिकल न्यूट्रिशन विषयातील प्रमाणित अभ्यासक्रम राबविण्यात येतात. त्याचा उपयोग उत्कृष्ट करिअरसाठीही होतो, असे डॉ. अक्षया जैन यांनी सांगितले. त्यांना आजपर्यंत अशा प्रकारचे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. आपले कार्य केवळ पुरस्कारांवरच अवलंबून नसून आपण भविष्यातही आपल्या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्नशील असल्याच्या भावना डॉ. अक्षया जैन यांनी व्यक्त केल्या आहेत.

हा कोर्स डॉक्टर्स आणि बारावी पासच्या पुढील महिला - पुरुष दोघेही करु शकतात. हा शासनमान्य कोर्स असल्याने स्वतंत्र व्यवसायालाही वाव आहे. ही इंडस्ट्री जगभरातून पुढे येत आहे. आजच्या एआय च्या युगात अनेक व्यवसाय - उद्योगात बेरोजगारी येण्याची शक्यता आहे.अशावेळी या क्षेत्रात स्थिरता राहणार असल्याने इकडे इच्छुकांची कल वाढावा यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचेही डॉ. जैन यांनी नमूद केले. सीआयएटीएन च्या संस्थापक - मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या डॉ. अक्षया जैन यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल कॉर्पोरेट सोशल फोकस या मॅगझीननेही घेऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे. मागच्या १२ वर्षांपासून त्या कॉस्मेटिक्स आणि एस्थेटिक मेडिसिनमध्ये प्रभावी कार्य करत आहेत.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूरच्या या भूमीकन्येला खूप खूप शुभेच्छा..

# शिवसेना व राष्ट्रवादीच्या सहकार्याने भाजप सत्ता स्थापणार - परभणी जिल्हा परिषद

**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हा परिषदेत शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट यांच्या समर्थनाने सत्ता स्थापन करावी, असे स्पष्ट निर्देश भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्ठींनी दिले आहेत.

जिल्हा परिषद निवडणूकीत ५४ पैकी २४ जागा पटकावून भारतीय जनता पार्टी सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला परंतु, सत्ता स्थापनेकरीता भाजपास २८ सदस्यांचे म्हणजेच आणखीन चार सदस्यांचे पाठबळ गरजेचे आहे. जिल्हा परिषदेंतर्गत पक्षीय बलाबलात एकूण ५४ जागांपैकी भाजप २४, त्या पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट १५, तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट ६, शिवसेना शिंदे गट ५, काँग्रेस ३ तर एक जागा अपक्षाने पटकावली आहे. त्यामुळेच काठावर बहुमत प्राप्त केलेल्या भाजपालाच सत्ता स्थापनेकरीता मोठी संधी आहे.

या जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांनी जिल्हा परिषदेंतर्गत या अभूतपूर्व यशानंतर जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पार्टीच सत्ता स्थापन करेल, असा दावा करतेवेळी शिवसेना शिंदे गटाचेच त्यासाठी सहकार्य घेतले जाईल, अशी पुष्टी जोडली. त्यामुळे भाजप



व शिवसेना शिंदे गट सहजपणे सत्ता स्थापन करेल, असे चित्र निर्माण झाले. परंतु, सत्ता स्थापनेच्या या घडामोडीत भाजपाच्या पक्ष श्रेष्ठींनी पालकमंत्र्यांसह भाजपाचे अन्य नेते व काही सदस्यांना मुंबईत पाचारण केले व सत्ता स्थापने संदर्भातील एकूण हालचालींचा अंदाज घेतला. त्या पाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पालकमंत्र्यांसह अन्य मंडळींना पाचारण करीत सत्ता स्थापनेत शिवसेना शिंदे गटाबरोबरच महायुतीतील मोठा घटक व मित्र पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाससुध्दा सहभागी करुन घ्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले असल्याची माहिती हाती आली आहे. त्यामुळेच जिल्हा परिषदेंतर्गत सत्ता स्थापनेच्या दृष्टीने हालचाली गतीमान झाल्या आहेत. विशेषतः अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य सभापतींच्या पदांच्या तडजोडीबाबतसुध्दा बैठकांचे सत्र सुरु झाले आहे. अध्यक्षपद हे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. त्याकरीता जिंतूर मतदारसंघातून एक व गंगाखेड मतदारसंघातून दोघे असे भाजपाच्याच तिघापैकी एका सदस्याची निवड अपेक्षित आहे. उपाध्यक्ष पदाबाबत अनिश्चितता आहे. परंतु, सभापती पदापैकी किमान एक-एक पद हे शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या हिश्यास जाईल, असे सर्वसाधारण चित्र आहे. एकंदरीत घडामोडीतून महायुतीतील तीनही घटक पक्षच संयुक्तपणे जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापन करणार व शिवसेना उबाठा, काँग्रेस या दोघा महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना सत्तेबाहेर रहावे लागणार.

## संक्षिप्त वृत्त...

### ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव यांना कुसुमाग्रज पुरस्कार जाहीर : काव्यक्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी:-** येथील ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव यांना यंदाचा कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान जाहीर झाला आहे. काव्य क्षेत्रातील त्यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल पुण्यातील विदिशा विचार मंचातर्फे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनी मंगळवार १० मार्च २०२६ रोजी हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. माजी संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक आणि संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्याहस्ते भालेराव यांना हा सन्मान प्रदान केला जाणार आहे. विदिशा विचार मंचाचे संस्थापक संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी हि माहिती दिली. या पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे. यापूर्वी पहिल्यावर्षी ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, दुसऱ्या वर्षी ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके, तीसऱ्या वर्षी ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

भालेराव यांचे १५ काव्यसंग्रह, ललितलेख संग्रह, सहा संपादने आणि इतर साहित्य प्रकाशित झालेले आहे. शासनासह विविध संस्थांच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या कवितांचे हिंदी आणि इंग्रजी भाषेतील अनुवाद साहित्य अकादमीने प्रकाशित केलेले आहे. महाराष्ट, कर्नाटक, गोवा या राज्याच्या अभ्यासक्रमासह राष्ट्रीय अभ्यासक्रमातही भालेराव यांच्या साहित्याचा समावेश आहे. त्यांनी विविध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविलेले आहे. दरम्यान, यंदचा कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान सोहळा मंगळवा १० मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता पुणे येथे होणार आहे, अशी माहिती विदिशा विचारमंचतर्फे देण्यात आली.

### ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह प्रकरणी १७० जणांविरुध्द कारवाई : कडेकोट पोलिस बंदोबस्तामुळे अपघाताच्या घटना टळल्या

**परभणी,/प्रतिनिधी :** होळी आणि धुळीवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस दलाच्या वतीने ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह प्रकरणी १७० जणांविरुध्द कारवाई करण्यात आली.

होळी व धुलीवंदनाच्या पार्श्वभूमीवर मद्यपान करून वाहन चालवू नये यासाठी जिल्ह्यात काही दिवसांपासून जनजागृती मोहीम राबविण्यात आली. विविध ठिकाणी फलकांच्या माध्यमातून वाहनधारकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यात धुलीवंदनाचा सण अपघातविरहित वातावरणात साजरा झाला. पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १९ पोलीस ठाणे तसेच शहर वाहतूक शाखेच्या वतीने ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान १७० मद्यपान करून वाहन चालविण्याच्या प्रकरणांची नोंद झाली. तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत दुचाकीवर तिघे बसणे व बदल केलेल्या सायलेन्सरसह वाहन चालविणाऱ्या चालकांविरुद्ध २३५ प्रकरणे नोंदविण्यात आली. या सर्व कारवायांमध्ये एकूण २ लाख १३ हजार ८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

जिल्ह्यात पुरेसा पोलीस बंदोबस्त आणि जनजागृतीमुळे कोणतीही मोठी अपघाताची घटना घडली नाही. वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे पालन करून अपघात टाळावेत व कारवाईस सामोरे जाऊ नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी केले आहे.

### 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत हरवलेली मालमत्ता प्रवाशांना परत : आरपीएफ कर्मचाऱ्यांनी तत्परता

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) प्रवाशांच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत असून 'ऑपरेशन अमानत' या उपक्रमांतर्गत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये आरपीएफ कर्मचाऱ्यांनी तत्परता आणि प्रामाणिकपणा दाखवत हरवलेली मालमत्ता प्रवाशांना सुरक्षितपणे परत केली.

पहिल्या घटनेत छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर २ मार्च २०२६ रोजी रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत गस्त घालत असताना हेड कॉन्स्टेबल नंदू सिंह बैनाडे यांना प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर चार्जिंगसाठी ठेवलेला मोबाईल फोन आढळून आला. परिसरात कोणीही प्रवासी नसल्याने त्यांनी चौकशी केली; मात्र मोबाईलचा मालक सापडला नाही. त्यानंतर मोबाईल आरपीएफ पोस्टमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला. यानंतर सरजेराव पिराजी लळजरे, रा. छत्रपती संभाजीनगर यांनी आरपीएफ पोस्टमध्ये येऊन आपल्या मुलाचा सुमारे १२ हजार रुपये किंमतीचा रियलमी कंपनीचा मोबाईल चार्जिंगला ठेवून घाईत विसरल्याची माहिती दिली. आवश्यक पडताळणी केल्यानंतर संबंधित मोबाईल पावती घेऊन त्यांच्या ताब्यात देण्यात आला.

दुसऱ्या घटनेत विभागीय सुरक्षा नियंत्रण नांदेड येथे गाडी क्रमांक १७४१७ एक्स्प्रेसमध्ये विसरलेली करड्या रंगाची मिनी हँडबॅग असल्याची तक्रार प्राप्त झाली. त्यानंतर कॉन्स्टेबल प्रविण कुमार यांनी नगरसोल रेल्वे स्थानकावर गाडी पोहोचताच बी-२ कोचमधील बर्थ क्रमांक ३३ येथे शोध घेतला असता संबंधित बॅग मिळून आली. त्या बॅगेत ८ हजार रुपये रोख रक्कम, हेडफोन, चार्जर, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड, ओळखपत्रे व कागदपत्रे असा एकूण सुमारे १२ हजार रुपये किंमतीचा माल आढळून आला. प्रवासी तारक भुतडा, रा. छत्रपती संभाजीनगर यांनी तिरुपतीहून प्रवास करताना ही बॅग गाडीत विसरल्याचे सांगितले. आधार कार्डद्वारे ओळख पटवून सर्व साहित्य त्यांना सुपूर्द करण्यात आले.

### जिंतूरच्या निराधार योजनेत पारदर्शकपणे काम करणार -डॉ. पंडितराव दराडे

**परभणी,/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाने नागरिकांसाठी विविध प्रकारच्या लोककल्याणकारी योजना चालू केलेल्या आहेत. परंतु काहीजण याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात, परिणामी गरजू लाभार्थी योजनेपासून दूर राहतात. यासाठी आपण जिंतूरच्या निराधार योजनेच्या कामात पारदर्शकता आणणार असून पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गरजूंना निराधार योजनेचा लाभ मिळवुन देणार आहोत, अशी ग्वाही समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांनी दिली.

जिंतूर येथील तहसील कार्यालयात शुक्रवार ६ मार्च रोजी निराधार योजना समितीच्या संचालक यांची बैठक संपन्न झाली. याप्रसंगी डॉ. दराडे बोलत होते. बैठकीस तहसीलदार श्रीमती शितल कच्छवे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, सहाय्यक गट विकास अधिकारी एस. व्ही. ढोने यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी समाजातील आर्थिक दुर्बल घटक व खऱ्या अर्थाने निराधार असलेले नागरिक यांना विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य करण्याबद्दल चर्चा करण्यात आली. जिंतूर येथील तहसील कार्यालयात शुक्रवार ६ मार्च रोजी निराधार योजना समितीच्या संचालक यांची बैठक संपन्न झाली.

## येलदरी'च्या आधुनिक सिलींग पध्दतीच्या पुलाच्या पोहोच रस्त्याच्या कामास मुहूर्त लागेना

**परभणी,/प्रतिनिधी :** येलदरी'च्या आधुनिक सिलींग पध्दतीच्या पुलाच्या पोहोच रस्त्याच्या कामास मुहूर्त लागेना : बांधकाम खात्याचं साफ दुर्लक्ष : जुन्या अरुंद पुलावर अपघाताची, बळीची मालिका सुरुच होती.

पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयावरील अरुंद असणाऱ्या धोकादायक पुलावर वर्षानुवर्षापासून अपघाताची व त्यातील बळींची मालिका ओळखून उशीरा का होईना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या साखरझोपेतील अधिकाऱ्यांना जागा आली, त्यातून आधुनिक सिलींग पध्दतीचा पूल उभारला गेला खरा, परंतु गेल्या दीड-दोन वर्षांपासून पुलाच्या दोन्ही बाजूचे पोहोच रस्ते पूर्ण न केल्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला हा पूल मागील दीड-दोन वर्षांपासून वापराविना धूळखात आहे. त्याचा परिणाम अरुंद अशा पुलावरुन धोकादायक पध्दतीने वाहनांची वाहतूक सुरु आहे.

गेल्या मंगळवारी रात्री ८ ते ९ वाजेच्या सुमारास शिंदे टाकळी (ता.सेनगाव) येथील अंकुश रामेश्वर शिंदे हा युवक पिकअप व्हॅन या वाहनाने आपल्या गावी निघाला होता. त्यावेळी येलदरी येथील अरुंद पुलावरुन तो या वाहनाद्वारे जात असतांना वाहनावरील ताबा सुटला अन् त्यांच्यासह वाहन थेट पूर्णा नदीच्या पात्रात कोसळले. दुर्दैव असे, रात्रीची ही घटना कोणाच्याही निदर्शनास आली नाही. त्यामुळे शिंदे यांना मदत मिळाली नाही. मदतीविना ते मृत्यूमुखी पडले. बुधवारी सकाळी पुलावरुन ये-जा करणाऱ्या वाहनांना तो अपघात लक्षात आला. तेव्हा धावपळ सुरु झाली. व पिकअप व्हॅनमध्ये अडकलेल्या शिंदे यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

नवा पुल तयार असतांनासुध्दा केवळ दोन्ही बाजूचे पोहोच रस्ते पूर्ण न झाल्यामुळे या अरुंद पुलावरुन नाईलाजास्तव धोकादायक वाहतुक सुरु आहे. त्यातून अपघाताची मालिका कायम आहे. या दुर्देवी अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी आणखी किती बळी गेल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग येणार? असा सवाल केला.

## मौजे श्रीरामवाडी व टाकळखोपा येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार

**जिंतूर/प्रतिनिधी -** मौजे श्रीरामवाडी व टाकळखोपा येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार. आज आमच्या आडगांव जिल्हा परिषद गटातील मौजे श्रीरामवाडी व टाकळखोपा येथे भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सन्माननीय श्री डॉ देवरावजी कऱ्हाळे साहेबांचा श्रीरामवाडी व टाकळखोपा ग्रामस्थांच्या वतीने माननीय श्री अविनाशी काळे माजी जि प सदस्य यांचे प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.



त्याचबरोबर उपरोक्त कार्यक्रमात माजी जिल्हा परिषद सदस्य श्री अविनाशजी काळे, आडगांव पंचायत समिती गणाचे भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित सदस्य श्री प्रकाशरावजी दाभाडे (दादा), इटोली पं स गणाचे सदस्य श्री बालाजी सांगळे, लिंबाचा पं स गणाचे सदस्य श्री माधव प्रभाकरराव दराडे या नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्यांसह उपस्थित मान्यवरांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. आडगांव जिल्हा परिषद गटाचे नवनिर्वाचित जि प सदस्य श्री डॉ देवरावजी कऱ्हाळे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना या भागाच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहून मुलभूत व पायाभूत सुविधांसह सर्वांगीण विकास चळवळीस आपण पुढे नेण्याचे काम करू, असा विश्वास व्यक्त करून आपणास मतदान रूपी आशिर्वाद दिल्याबद्दल कृतज्ञभाव व्यक्त केला व सर्व मतदारांचे आभार मानले. मौजे श्रीरामवाडी व टाकळखोपा ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभास आडगांव जि प गटाचे सदस्य डॉ श्री देवरावजी कऱ्हाळे, माजी जि प सदस्य श्री अविनाशजी काळे, आडगांव पं स सदस्य श्री प्रकाशरावजी दाभाडे (दादा) इटोली पं स सदस्य श्री बालाजीराव सांगळे, चिंचोली मानधानी पं स सदस्य श्री माधवराव दराडे, सरपंच मौजे देवसडी श्री शिवाजीराव काळे, डॉ शिवाजीराव घुगे, श्री वाळके सर, व विश्वनाथ राऊत यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर माजी सरपंच सर्वश्री देवबारावजी दळवे, विश्वनाथरावजी घुगे, रावसाहेब दादा घुगे, लिंबाजीरावजी गिते साहेब, दगडोजी घुगे, डॉ शिवाजीराव घुगे, सचिन सांगळे, मारोती घुगे, जगनराव घुगे, विठ्ठलराव चिलगर, नारायण श्रीरामे आदींसह मौजे श्रीरामवाडी व टाकळखोपा येथील सर्व सन्माननीय ग्रामस्थांसह परिसरातील सर्व सन्माननीय नागरिक आवर्जून उपस्थित होते दरम्यान या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सचिन सांगळे यांनी केले तर श्री मारोती घुगे यांनी आभार मानले.

## माझं आयुष्य उध्वस्त करणाऱ्या नराधमास शिक्षा द्या

### छत्रपती संभाजीनगर येथील लव्ह जिहाद पिडीत तरुणीचे परभणीत पत्रकार परिषदेतून मुख्यमंत्र्यांना साकडे

**परभणी,/प्रतिनिधी :-** लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदु तरुणीचे आयुष्य उध्वस्त करण्याचे सुनियोजित प्रयत्न सुरु आहेत. आपण त्याची पिडीता आहोत. अशा नराधमांना कठोरात कठोर शिक्षा मिळावी, तरच आपणास न्याय मिळेल, असे मत छत्रपती संभाजीनगर येथील एका पिडीतेने परभणीत शुक्रवारी सायंकाळी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून व्यक्त केले.

आपण छत्रपती संभाजीनगरचे रहिवाशी आहोत. पती मोहम्मद उमर मोहम्मद जावेद हे परभणीचे आहेत. परंतु तो छत्रपती संभाजीनगरात वास्तव्यास होता. त्याने मैत्रीच्या निमित्ताने जवळीक साधली, त्यातून धर्मांतर करण्यास भाग पाडले. १५ जून २०२० रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जबरदस्तीने मुस्लिम धर्माप्रमाणे विवाह करण्यास भाग पाडले. लग्नानंतर काही महिन्यातच त्याने आक्षेपार्ह कृती सुरु केल्या. पतीचे नातेवाईक व इतर वेगवेगळ्या व्यक्तींनी आपल्यावर शारिरीक अत्याचार केले. या संदर्भात आपण बेगमपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यातून गुन्हेही दाखल झाले आहेत. या प्रकारानंतर आपण वडिलांच्या घरी राहत होतो. २०२४ मध्ये आई मृत्यू पावली. त्याचवेळी पतीने पुन्हा जवळीक साधली. त्याने संभाजीनगरला येऊन सोबत राहु लागला. गोड बोलून त्याने आपणास परभणीस आणले. मात्र याही ठिकाणी आपल्यावर अत्याचार सुरु केले, मारहाणही केली. पाच ते सहा तोळे सोनेही लंपास केले. या प्रकरणात आपण २७ फेब्रुवारी रोजी नानलपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली व मोहम्मद उमर मोहम्मद जावेद यांच्यासह अन्य जणांविरोधात गुन्हा दाखल झाला. परंतु, अद्यापपर्यंत कुणाविरुध्दही कारवाई झाली नाही, अशी खंत या पिढीतेने व्यक्त करीत या गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई व्हावी, हिंदु तरुणीचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्यांना त्याद्वारे धास्ती बसेल, अशी अपेक्षा या पिडीतेने व्यक्त केली आहे.

## महिलांनी नोकरी क्षेत्रात आपली कार्य सिध्दता सिध्द करावी- सौ. स्वाती आघाव

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जानेवारी २०२२ या महिन्यांमध्ये माझा उजव्या



पायामध्ये थ्रोम्बसिस होऊन त्याचे रूपांतर गँगरीन आजारामध्ये झाले तीन वेळा पायाची एन्जोप्लास्टी झाली परंतु काही उपयोग झाला नाही शेवटी मला माझा उजवा पाय गुडघ्या खालून मला गमवावा लागला मला एक वर्ष चालता येत नव्हते अशा परिस्थितीत माझे शिक्षक होण्याचे स्वप्न बघत टेंट चा अभ्यास करीत मला मेरिट चे मार्क मिळवून मी जवाहर विद्यालय मध्ये दिव्यांग कोठ्या मधून सहशिक्षक पदावर रुजू झाले यापूर्वी मला दोन वेळा इतर जिल्ह्यांमध्ये सहशिक्षक पदाची नोकरी मधून मिळाली होते परंतु मला घरच्यांनी जिंतुर तालुका सोडून इतरत्र नोकरी करण्यास परवानगी दिली नाही शेवटी मी माझा दिवंगत्वावर मात करून अभ्यास व आत्मविश्वासाच्या जोरावर माध्यमिक सहशिक्षक पदी रुजू झाले माझ्या सर्व महिला भगिनींना जागतिक दिनाच्या दिनानिमित्त मी आव्हान करू इच्छिते की जास्तीत जास्त महिलांनी नोकरी क्षेत्रात येऊन आपली कार्य सिद्धता सिद्ध करावे .... सौ.स्वाती गोविंद आघाव रा.बेलखेडा या महिलेने आवाहन केले आहे.

## गंभीर गुन्ह्यातील दोन आरोपी ताब्यात : जिल्ह्यातील घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस :स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाची कारवाई : १ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**परभणी ,/प्रतिनिधी:** परभणी ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पारवा येथील गुन्ह्यामधील पाहिजे असलेल्या आरोपीसह अन्य एकास गंगाखेड ठाण्याच्या हद्दीतून स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग शाखेच्या पथकाने गुरुवारी ताब्यात घेतले. त्यामध्ये दरोडा, खून, जबरी चोरी अशा महत्वाच्या गुन्ह्यात या प्रमुख आरोपींचा समावेश आहे. जिल्ह्यातील पाच ठिकाणच्या घरफोडी या आरोपींना ताब्यात घेतल्याने उघड झाल्या आहेत.

जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून पारवा गुन्ह्यामधील पाहिजे असलेला आरोपी हा गंगाखेड हद्दीत असल्याचे समजले. त्यावरून आरोपी शेष्या चपऱ्या काळे (३८, रा. मोहोळ, जि. सोलापूर) हा त्याच्यासोबत असलेला साथीदार अलिषा उर्फ आल्या उर्फ काळ्या सुरेश काळे (रा. दत्तनगर, मोहोळ, जि. सोलापूर) हे दोघे मिळून आले. त्यांना पोलीस पथकाने ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी साथीदार लाड्या राम भोसले (महातपुरी तांडा, ता. गंगाखेड) यांच्या मदतीने घरफोडी व चोरीचे गुन्हे केल्याची माहिती दिली आहे.

त्याच्याकडून गुन्ह्यात गेलेल्या मुद्देमालापैकी नगदी व सोन्या-चांदीचे दागिने असा एक लाख ८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. धारदार चाकूही जप्त करण्यात आला. आरोपी शेष्या काळे आणि आल्या काळे या दोघास सोनपेठ ठाण्यात हजर करण्यात आले. सदर आरोपींकडून जिल्ह्यातील सोनपेठ, जिंतूर, दैठणा, गंगाखेड येथील पाच घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले. आरोपी शेष्या काळे हा दरोडा, खून, जबरी चोरी अशा महत्त्वाच्या गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी आहे.

परभणी ग्रामीण, पूर्णा, गंगाखेड येथील गुन्ह्यात त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात तर अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थागुशाचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, कर्मचारी महेश कवठाळे, राहुल परसोडे, रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, माणिक वाघ, लक्ष्मण कांगणे, सिद्धेश्वर चाटे, मुकेश बुधवंत, पांडुरंग तूपसुंदर, केशव लटपटे, उत्तम हनवते, गजानन क्षीरसागर, दिलीप निलपत्रेवार, राम पौळ, नामदेव डुबे, शरद सावंत, कश्यप साने, हुसेन, गणेश कौटकर यांच्या पथकाने केली.

## अग्रलेख...

# दूरदृष्टीचा अर्थसंकल्प

सध्याची जागतिक परिस्थिती अस्थिर आहे. कितीही नाही म्हटले तरी जगातील प्रत्येक आर्थिक आणि सामाजिक घडामोडीचा परिणाम सामान्यांवर होतोच; मग ते त्या देशातील निवासी असोत वा नसोत. वर्तमानात जगभर अनेक संघर्ष सुरू आहेत. इस्रायल विरुद्ध हमास, रशिया विरुद्ध युक्रेन आणि यांत भर म्हणून इराण-अमेरिका-इस्रायल असा संघर्ष सुरू झाला आहे. आखाती देश त्यात प्रत्यक्ष होरपळत आहेत. त्याची अप्रत्यक्ष झळ भारतालाही बसते आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने इंधन महागण्याची चिन्हे दिसत आहेत. इंधन महागले की सारेच महागते. संघर्ष लवकर संपले नाहीत तर वाढत्या उष्णतामानासोबत महागाईच्या झळा आपल्या साऱ्यांना पोहोचू लागतील, याचा अंदाज आताच करता येतो. या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प बराच दिलासा देणारा आणि त्यातही शेतकऱ्यांसाठी फार आशादायक म्हणावा लागेल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विचारांचा पल्ला किती मोठा आहे, हेही या अर्थसंकल्पातून दिसून येते.

कोणताही अर्थसंकल्प आणि कोणतेही सरकार सर्वांचे समाधान एका बजेटमध्ये करू शकत नाही. विकास ही जशी सतत चालणारी प्रक्रिया असते, तसेच अर्थसंकल्पाचे असते. भूतकाळाचा आढावा घेऊन पुढील वर्षभर कोणत्या दिशेने जायचे, कोणत्या कामावर किती खर्च करायचा, कशावर भर द्यायचा, कोणत्या कामांना वेग द्यायचा हे अर्थसंकल्पाद्वारे ठरविले जाते. त्या दृष्टीने पाहिले तर शेतकरी-शेती ते स्टार्ट अप्स अशा मोठ्या 'रेंज'मध्ये अनेकानेक विषय कवेत घेणारा आणि त्यातही शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा हा अर्थसंकल्प आहे. कर्जमाफी हा बहुप्रतीक्षित आणि मोठा दिलासा आहेच. महागाईची चाहुल पाहता ही घोषणा फार महत्त्वाची ठरते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर झाली आहे. त्यानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी आणि नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन राशी, असे या कर्जमाफी योजनेचे स्वरूप असेल. त्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यावर लक्ष दिले जाणार असून समितीच्या शिफारसींनुसार शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी पावले उचलण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. याशिवाय, पिकांची मूल्यसाखळी तयार करून शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न, अॅग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी आदी प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून एकात्मिक व्यवस्थेची उभारणी, कृषी क्षेत्रात एआयचा वापर, एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विद्यापीठांना जबाबदारी, प्राकृतिक शेती अभियान, बळीराजा मोफत वीज योजना सुरू ठेवण्याचा निर्णय अशा इतरही तरतुदी या अर्थसंकल्पात आहेत आणि त्या शेतकऱ्यांचे भले पाहण्यासाठी आहेत. महाराष्ट्राचे शहरीकरण वेगाने होत आहे. महाराष्ट्राची साधारणतः ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरांमध्ये किंवा शहरांच्या भोवती असलेल्या उपनगरी वसाहतींमध्ये राहते. अशा राज्यात केवळ शहरांसाठी काम करून भागत नसते. कारण ग्रामीण भागात राहणाऱ्यांची संख्या अजूनही ४० टक्क्यांच्या आसपास आहे आणि त्यांच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न हे शेतीशी संबंधित आहेत. हे ओळखून शेती व शेतकऱ्यांसाठी भरीव तरतुदी आणि योजना आणल्याबद्दल महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन केले पाहिजे.

२०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सची करणार, असे आश्वासन सरकारतर्फे देतानाच शेतीचा जीडीपी ९ ते १० पट वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे आणि त्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत, हे या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य. हा अर्थसंकल्प एकूण चार स्तंभांवर आधारित असल्याचे सरकारने सांगितले. प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासनाभिमुख असा हा अर्थसंकल्प असल्याची ग्वाही दिली गेली. प्रत्येक स्तंभात ४ उपक्षेत्रे गृहीत धरून एकूण १६ उपक्षेत्रांच्या भोवती या अर्थसंकल्पाच्या तरतुदी फिरतात. शेतीला जोडून सिंचन आणि पाणी या दोन विषयांबद्दल भविष्यवेधी दृष्टिकोनाचा अंगीकार या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. २०४७ सालातील विकसित भारताच्या उद्दिष्टाशी समांतर विकासाची दिशा म्हणून ग्रामीण भागात प्रतिदिन दरडोई ५५ लिटर्स आणि शहरांत दरडोई १३५ लिटर पाण्याच्या उपलब्धतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. शेतीच्या सिंचनासाठीही वेगवेगळ्या योजना घोषित करण्यात आल्या आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद, एकल महिलांचे सर्वेक्षण, लखपती दीदी, महिला बचत गटाच्या वस्तूंच्या विक्रीसाठी उमेद मॉल या तरतुदी भगिनींसाठी महत्त्वाच्या आहेत. युवक, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राकडेही सरकारने लक्ष दिले आहे. नवी मुंबईत सहा देशांची विद्यापीठे याचवर्षी सुरू होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी 'विज्ञान वारी' योजनेंतर्गत इस्रो आणि नासा या संस्थांना भेट देण्याची संधी, महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड अॅडव्हान्समेंट (महिमा) या संस्थेची स्थापना करून परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण व आर्थिक मार्गदर्शन या भविष्यवेधी योजना म्हणता येतील. विविध प्रकारच्या खेळांमध्ये नैपुण्य प्राप्त करता यावे यासाठी विशेष केंद्रांची उभारणी, विभागीय स्तरावर क्रीडा उत्कृष्टता केंद्रे आणि जिल्हा स्तरावर क्रीडा गुणवत्ता विकास केंद्रे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा वारसा जतन करण्यासाठी उपाय, महाराजांचे आग्रा येथील स्मारक, संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम, महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधिस्थळांचे संवर्धन, महात्मा जोतिबा फुले यांची २०० वी जयंती व त्यानिमित्त त्यांचे स्मारक, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार स्थळे सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा, संत गाडगेबाबा यांचे १५० वे जयंतीवर्ष असल्याने तीर्थक्षेत्र सर्किट, संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान अशा विविध घोषणा करतानाच महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींचे विशेष वर्ष म्हणून २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याची घोषणा सरकारने केली आहे. नैतिक स्वरूपाच्या भौतिक विकासाला इतिहास-संस्कृती आणि वारशाचे पाठबळ लागते असे म्हणतात. त्याचे हे उदाहरण. जगद्गुरू तुकाराम महाराजांचे देहू येथील जीर्ण घर आणि जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी आराखडा, नाशिक-त्र्यंबक कुंभमेळ्यासाठी भरीव तरतूद, मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषांमध्ये तसेच अन्य भाषांमधील दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी'ची स्थापना हे मुद्दे देखील आपल्या वारशाप्रति फडणवीस सरकार सजग असल्याचे दर्शवितात. मुंबई ते गडचिरोलीचा स्टील हब, शेती ते स्टार्ट अप्स अशा असंख्य मुद्द्यांवर-विषयांवर तरतुदी आहेतच. शहरी विकास, जलवाहतूक, बुलेट ट्रेन, छोट्या विमानतळांचा विस्तार, औद्योगिक केंद्रांचा विकास, ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम ही आणखी काही दूरदृष्टीची उदाहरणे सांगता येतील. या सर्व तरतुदी व योजना चांगल्या आहेत, यात वाद नाही. तरीही एक म्हणावेसे वाटते की, अर्थसंकल्पातील घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अंतर दशकानुदशके तसेच राहिले आहे. सुशासन-गतिमानता हे जे मुद्दे यंदाच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले गेले आहेत, त्यात या न्यूनाची उत्तरे सापडू शकतात, हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. नागरिकांना सेवा देणे आणि विविध योजनांची अंमलबजावणी करणे अशी दुहेरी जबाबदारी अनेक सरकारी विभाग तसेच कार्यालयांमध्ये सांभाळली जाते. अनेकदा असा अनुभव येतो की, एकही गोष्ट धड झालेली नाही. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' ही म्हण आता तरी खोटी ठरली पाहिजे. पैसा तर खर्च होणारच आहे; तो सत्कारणी लागला पाहिजे आणि काम वेगाने झाले पाहिजे. सामान्यांना सहज सोप्या शब्दांत अर्थसंकल्प समजावून सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या या दूरदृष्टीच्या अर्थसंकल्पातील दृष्टी प्रत्यक्ष अवतरायची असेल तर 'सुशासना'ला गतिमानतेची चाके हवीच!

---

## स्मरण

**दुर्गा मडावी**

# धाडसी महिला राणी गाईदिनल्यू

**भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक अत्यंत तेजस्वी आणि धाडसी महिला राणी गाईदिनल्यू या नागालँडच्या 'झाशीच्या राणी.' उद्या जागतिक महिला दिन. त्यानिमित्ताने त्यांचे स्मरण...**

मणिपूर राज्यातील न्गुआओ या गावात राणी गाईदिनल्यू यांचा जन्म २६ जानेवारी १९१५ रोजी झाला. 'रोंगमेई' नागा जमातीच्या राणी मां केवळ १३ वर्षांच्या असताना आपल्या चुलत भावाच्या- हैपौ जदोनांग यांच्या 'हेरका' चळवळीत सहभागी झाल्या. ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि ख्रिश्चन धर्मांतराविरुद्धची ही चळवळ होती. जदोनांग यांना ब्रिटिशांनी फाशी दिल्यानंतर गाईदिनल्यू यांनी चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. त्यांनी नागा लोकांमध्ये राष्ट्रवादाची ज्योत पेटवली. त्याअंतर्गत त्यांनी ब्रिटिशांना कर न देण्याचे आवाहन केले आणि गनिमी काव्याने त्यांच्याविरुद्ध लढा दिला. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी मोठे बक्षीस ठेवले होते. अखेर १९३२ मध्ये, वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांना अटक करण्यात आली आणि जन्मठेपेची शिक्षा झाली.

१९३७ मध्ये शिलाँग तुरुंगात असताना पंडित जवाहरलाल नेहरू त्यांची भेट घ्यायला गेले होते. त्यांचे धैर्य पाहून नेहरूंनी त्यांचे वर्णन 'डोंगरांची मुलगी' (डॉटर ऑफ द हिल्स) असे केले अन् त्यांना 'राणी' ही पदवी बहाल केली. तेव्हापासून त्या राणी गाईदिनल्यू म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यावरच त्यांची तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर आयुष्यभर नागा संस्कृतीचे जतन आणि समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. भारत सरकारने त्यांना १९८२ मध्ये 'पद्मभूषण' देऊन सन्मानित केले.

राणी गाईदिनल्यू यांचे आयुष्य हे केवळ संघर्षाची कहाणीच ठरले. त्यांनी चालवलेली हेरका चळवळ आणि त्यांचा तुरुंगवास हे दोन्ही कालखंड त्यांच्या संघर्षाचे सर्वात महत्त्वाचे पैलू आहेत. हेरका चळवळ केवळ राजकीय नव्हती तर ती धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळ होती. नागा जमातीच्या पारंपरिक धार्मिक प्रथांचे रक्षण करणे आणि ब्रिटिशांच्या मदतीने होणाऱ्या सक्तीच्या धर्मांतराला विरोध करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. 'हेरका' या शब्दाचा अर्थ 'शुद्ध' असा होतो. प्रारंभीच्या काळात ही चळवळ हैपौ जदोनांग यांनी सुरू केली. 'नागाराज' स्थापन करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. या भागात शाळा नसल्यामुळे गाईदिन्ल्यूचे शिक्षण होऊ शकले नाही. ब्रिटिश अधिसत्तेच्या या कालखंडात भारतभर ब्रिटिशविरोधी लढे सुरू होते. गाईदिन्ल्यूचा चुलतभाऊ हैपोऊ जादोनांग याने



हेरका नावाचे धार्मिक आंदोलन सुरू केले. विशेषतः नागा लोकांच्या ख्रिश्चनीकरणास त्यांनी विरोध केला. हळूहळू हे आंदोलन सशस्त्र बनले. झेलियनग्रोंग जमातीतील लोक या आंदोलनाकडे आकर्षित झाले. वयाच्या तेराव्या वर्षी गाइदिन्ल्यू या आंदोलनात सहभागी झाली. चळवळीशी जोडल्या गेल्या. त्यांनी महिलांची एक संघटना बांधली आणि ब्रिटिशांविरुद्ध गनिमी काव्याने लढण्याचे प्रशिक्षण दिले.

जदोनांग यांच्या अटकेनंतर त्यांनी विखुरलेल्या सैन्याला एकत्र केले आणि ब्रिटिशांविरुद्ध लढा अधिक तीव्र केला. ब्रिटिश सरकार राणी गाईदिनल्यू यांना इतके घाबरले होते की, त्यांना पकडण्यासाठी संपूर्ण आसाम रायफल्सला कामाला लावले होते. एका मोठ्या लष्करी कारवाईनंतर त्यांना पोखरांग गावातून अटक करण्यात आली. वयाच्या केवळ १६ व्या वर्षी म्हणजे १९३२ साली ब्रिटिश सरकारने ही कारवाई केली. इतकेच नव्हे, त्यांच्यावर हत्येचा प्रयत्न आणि देशद्रोहाचे आरोप लावून जन्मठेपेची शिक्षाही सुनावली. त्यांना एका तुरुंगात न ठेवता गुवाहाटी, शिलाँग, ऐझॉल आणि तुरा अशा वेगवेगळ्या तुरुंगांत हलवण्यात आले. याचे कारण असे की, त्या जिथे जात तिथे लोक त्यांचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करत आणि पुन्हा उठाव होण्याची भीती ब्रिटिशांना वाटत असे. गनिमी काव्यात, शस्त्र चालविण्यात तरबेज असलेल्या गाईदिन्ल्यूबरोबर सुमारे चार हजार क्रांतिकारी लोकांचे संघटन होते. जादोनांगला फाशी दिल्यानंतर नागा लोकांत असंतोष पसरला होता. त्याला ब्रिटिश विरोधाकडे वळविण्यात तिला यश मिळाले. दरम्यान, वयाच्या १६ व्या वर्षी तुरुंगात गेलेल्या गाईदिनल्यू थेट १९४७ मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी बाहेर आल्या. त्यांच्या तारुण्याचा सुवर्णकाळ त्यांनी देशासाठी तुरुंगात व्यतीत केला.

१९३७ मध्ये जेव्हा जवाहरलाल नेहरू आसामच्या दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांना या तरुण मुलीच्या साहसाची माहिती मिळाली. त्यांनी राणी गाईदिनल्यू यांची तुरुंगात भेट घेतली आणि त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. ब्रिटिश सरकारला पत्र लिहून सुटकेची मागणीही केली; परंतु गाईदिनल्यू बाहेर आल्यास पुन्हा विद्रोह होईल, या भीतीने ब्रिटिशांनी त्यांना सोडण्यास नकार दिला होता. अखेर १९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हाच त्यांची सुटका झाली. राणी गाईदिनल्यू यांनी स्वतंत्र भारतातही नागा लोकांच्या हक्कासाठी लढा सुरूच ठेवला होता. त्या ईशान्य भारताच्या प्रबळ इच्छाशक्तीचे प्रतीक आहेत. अशा या राणी गाईदिनल्यु मां यांचा १७ फेब्रुवारी १९९३ रोजी त्यांच्या लुंकाऊ या जन्मगावी देहान्त झाला. त्यांना कोटी कोटी वंदन.

(लेखिका चंद्रपूर जिल्ह्यातील बोर्डा शासकीय आश्रमशाळेच्या शिक्षिका आहेत.)

---

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# समाजाला हवेत अपघातग्रस्त रक्षक!

कठीण समय येता, कोण कामास येतो, असा वाक्प्रचार आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. पण कठीण समय येता मी कामास येणार, असे ठासून म्हणणारे समाजात निर्माण होण्याचे प्रमाण कमी आहे. तसे पाहता मदत करणे हा मानवाचा स्थायी स्वभाव हवा. मात्र तसे न घडता एखाद्यावर वाईट प्रसंग उद्भवल्यास तमाशा पाहणारेच सभोवताल गोळा होतात. मदतीसाठी एखादाच धावतो. गुरुवार ५ मार्च २०२६ रोजी नागपूर जिल्ह्यातील कोराडी-खापरखेडा भागात पती-पत्नीने मिळून एका व्यक्तीची खुलेआम हत्या केली. ही हत्या होत असताना जाणाऱ्या-येणाऱ्यांनी तिथे थांबून त्याचे व्हिडीओ शूटिंग केले, पण मदतीसाठी एकही व्यक्ती धावली नाही. व्हिडीओ तयार करण्यासाठी लोकांजवळ वेळ होता; मग मदतीसाठी का नाही, असा प्रश्न मनात आला. समजा लोक धावले असते तर कदाचित पती-पत्नीच्या हातून घडणारा गुन्हा टाळणे शक्य होते. अशाच स्वरूपात लोक अपघातानंतर व्हिडीओ बनवितात आणि जखमींना सोडून रणछोडदास बनण्यात धन्यता मानतात.

याला माणुसकी म्हणत नाही. आपल्या समाजाला अपघातग्रस्त रक्षकांची गरज आहे. जेव्हा केव्हा अपघातग्रस्त रक्षकांची फौज तयार होईल, तेव्हा या देशात कुठलीही व्यक्ती रस्त्यावर तडफडून मरणार नाही. कुठलेही गुन्हेगार खुलेआम सामान्यांवर हात उगारणार नाहीत. पण तो दिवस खरोखरच या देशात येऊ शकतो का? याचे उत्तर होय असेच देता येईल. याकरिता आपल्याला मुला-मुलींवर लहानपणापासून मदतीचा भाव बिंबवावा लागेल. मदत केल्याने काय आत्मिक समाधान प्राप्त होते, हे त्यांना पटवून द्यावे लागेल. कदाचित पहिल्या वर्गापासूनच सामाजिक कार्य हा विषय त्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावा लागेल. त्यात मुलांना गुण देण्याची पद्धत स्वीकारावी लागेल. गुणांच्या लोभापायी का असेना मुले मदतीसाठी पुढे येतील. कोरोना काळात डॉक्टर, पोलिस, दानशूर लोक, व्यापारी, पत्रकार, राजकीय नेते समाजातील पीडितांसाठी देवदूत म्हणून धावत आले. त्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता पीडितांना मदतीचा हात दिला. परिणामी आपण चीननिर्मित कोरोनाला हद्दपार करण्यात यश मिळविले. तसे पाहता समाजात एकता असल्यास कुठलाही गुन्हेगार गुन्हा करण्यापूर्वी शंभरवेळा विचार करतो. एवढा धाक समाजाकडून निर्माण होऊ शकतो. पण समाज एकवटण्यास तयारच नाही. समाजात केवळ २ टक्के लोक दुर्जन आहेत तर उर्वरित ९८ टक्के सज्जन आहेत. दुर्दैवाने दुर्जन एकमेकांच्या मदतीला पटकन जातात. सज्जन मात्र स्वतःला अलिप्त ठेवतात. परिणामी अपघातग्रस्तांना आणि गुन्हेगारांनी केलेल्या हल्ल्यातील पीडितांना मदत मिळत नाही. नंतर मात्र हेच लोक पोलिसांच्या नावाने शिमगा करतात. तसे पाहता जी व्यक्ती स्वतःहून कुणाला मदत करीत नाही, त्यांना कुणावरही ताशेरे ओढण्याचा अधिकार नाही. जी कर्तव्याची पूर्तता करेल तिनेच इतरांकडून अपेक्षा ठेवावी, असाच सृष्टीचा नियम सांगतो. पण अपघातग्रस्त रक्षकांची उणीव सतत राहण्यासाठी जेवढा समाज कारणीभूत आहे, तेवढेच आपल्याकडील कायदे व प्रशासन जबाबदार आहे. वाईट काम केल्यास गावभर बदनामी करणारे जागोजागी आहेत. पण चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक करणारे हाती दिवा घेऊनही सापडत नाहीत. जेव्हा चांगले काम करणाऱ्यांना तत्काळ त्याचे फळ मिळेल त्या दिवसांपासून त्यांची संख्या वाढेल, असा माझा दावा आहे. नागपुरात रोडमार्क फाऊंडेशनचे संस्थापक राजू वाघ यांनी अपघातग्रस्त रक्षक तयार व्हावेत याकरिता खास उपक्रमच हाती घेतला आहे. तर सावनेर तालुक्यात कुठेही अपघात घडो, त्यातील जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत म्हणून हितेश बनसोड आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी हजर राहतात. राजू वाघ असो किंवा हितेश बनसोड दोघांनी सुरू केलेली समाजसेवा हटकेच म्हणावी लागेल. पण मग त्यांचे पाहून इतर मंडळी केवळ तमाशा का पाहतात? हत्या होत असताना व्हिडीओ तयार करणाऱ्यांनी पीडिताला वाचविण्याचा प्रयत्न का केला नाही. आता ते म्हणतील, आम्हाला आमच्या जिवाची भीती होती. मग व्हिडीओ तयार करताना ती भीती कुठे गेली होती, याविषयी आत्मचिंतन व्हावे. असाच प्रकार डॉक्टरांनी, पोलिसांनी कर्तव्यपूर्तीच्या पूर्वी केला तर आपल्याला आवडणार आहे का? मग ज्या समाजात आपण राहतो, त्यांच्या प्रती आपले काहीच कर्तव्य नाही का? ही बाब समजून घ्यावीच लागेल. शेवटी, तो खूप चांगला होता, हा समाजाकडून मिळणारा पुरस्कार माणसाला मेल्याशिवाय भेटत नाही. ही प्राचीन पद्धत समाजाने बदलली तर नक्कीच आपल्याकडेही अपघातग्रस्त रक्षक वाढतील, नाही का?

९८८१७१७८५९

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# निमित्त धर्म स्वातंत्र्य अधिनियमाचे

भारतीय राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला धर्म स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. राज्य घटनेच्या कलम २५ ते २८ अंतर्गत नागरिकांना आपल्या श्रद्धेनुसार धर्म स्वीकारण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रसार करण्याचा अधिकार आहे. मात्र, या अधिकाराचा गैरवापर होऊ नये, जबरदस्ती, प्रलोभन किंवा फसवणुकीच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणले जाऊ नये, यासाठी विविध राज्यांनी वेळोवेळी कायदे केले आहेत. त्याच पृष्ठभूमीवर धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ हा कायदा तयार झाला असून आता लवकरच त्याला मूर्त रुप मिळेल. आता लव्ह जिहाद, बळजबरी धर्मांतरण यांसारख्या घटनांना लगाम बसेल. मिशनऱ्यांच्या माध्यमातून होणाऱ्या सामूहिक धर्मांतरणासारख्या कूप्रकारांना आळा बसेल, अशी आशा आहे. त्यामुळे फडणवीस सरकारचं, महायुती सरकारचं अर्थात एकूणच महाराष्ट्र सरकारचं अभिनंदन...

धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ चा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या धर्म स्वातंत्र्याचा आदर राखत असताना जबरदस्तीने, फसवणूक करून किंवा प्रलोभनं देऊन घडवून आणल्या जाणाऱ्या धर्मांतरांवर नियंत्रण ठेवणे हा आहे. समाजात धार्मिक सलोखा टिकविणे, सामाजिक तणाव टाळणे हे या कायद्यामागील प्रमुख हेतू आहेत. यापूर्वी सदर प्रकारचे कायदे उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरयाणा आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात आहे. सगळ्यात पहिले हा कायदा ओडिशा राज्यात १९६७ मध्ये झाला. तर, आत्ता अलिकडे २०२१ मध्ये गुजरात व मध्यप्रदेश आणि २०२२ मध्ये हरयाणा आणि हिमाचल प्रदेशात हा कायदा झाला आहे. महाराष्ट्रानेही आता हा कायदा आणण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकलेलं आहे.

**जबरदस्ती, फसवणूक आणि प्रलोभनाला प्रतिबंध** : या कायद्यानुसार, कोणत्याही व्यक्तीला स्वतःच्या इच्छेनुसार धर्म स्वीकारण्याचा अधिकार कायम आहे. मात्र, त्यासाठी वेगवेगळ्या वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्यांवर आता जरब बसविल्या जाणार आहे. या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे जबरदस्ती, फसवणूक, दबाव किंवा



आर्थिक प्रलोभन देऊन धर्मांतरण करणाऱ्यांना थेट तुरुंगात जावे लागणार असून जामीन मिळणेदेखील कठीण झाले आहे. या सगळ्यावर सरकारचे बारकाईने लक्ष असणार आहे. प्रलोभनाच्या संकल्पनेत पैसे, नोकरीचे आश्वासन, विवाहाचे आमिष, चांगले शिक्षण किंवा वैद्यकीय सुविधा देण्यासारख्या मदतीचा आव आणून विश्वास संपादन करून एखाद्या व्यक्तीला धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न गुन्हा ठरणार आहे. धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ अंतर्गत गुन्ह्याच्या स्वरूपानुसार शिक्षेची मुदत वेगवेगळी असू शकते.

विशेषतः जबरदस्ती किंवा फसवणुकीच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणल्यास कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे तसेच अशा प्रकारच्या धर्मांतरात सामील असलेल्या व्यक्तीचे नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक संस्थांवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. या कायद्यात काही विशेष वर्गांच्या संरक्षणासाठी अधिक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. महिला, अल्पवयीन, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील व्यक्तींचे धर्मांतरण जबरदस्तीने किंवा फसवणुकीने घडवून आणल्यास त्यासाठी अधिक कठोर शिक्षा ठेवण्यात आली आहे. कारण या घटकांना समाजात तुलनेने अधिक असुरक्षित मानले जाते. त्यामुळे त्यांच्या बाबतीत धर्मांतराचा प्रश्न अधिक संवेदनशील मानून कायद्यात कठोरता दाखविण्यात आली आहे. दुर्बल घटकांच्या हक्कांचे संरक्षण करणे या कायद्यामुळे शक्य होणार आहे.

**विवाह आणि धर्मांतर** : युती सरकारने डिसेंबर २०२२ मध्ये महिला व बाल विकास विभागांतर्गत 'आंतरधर्मीय विवाह परिवार समन्वय समिती' स्थापन केली होती. मात्र, याला फार काही यश प्राप्त होऊ शकले नाही. कारण त्याला कायद्याचा आधार नव्हता, तक्रार आल्यास ही समिती चौकशी करणार होती. आता जेथे जबरदस्ती केली जात आहे, तेथे तक्रार करायला कोण धजावेल? त्यामुळे याचा काही फार उपयोग या प्रकारावर आळा बसविण्यासाठी होऊ शकला नाही. आता मात्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ मध्ये विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धर्मांतरांबाबतही काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. स्वेच्छेने आणि परस्पर संमतीने केलेल्या विवाहांवर कोणताही निर्बंध असणार नाही. मात्र, एखाद्या विवाहाचा उद्देश केवळ धर्मांतर घडवून आणणे हा असेल, तर अशा विवाहांची चौकशी करण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**कायद्यावरील चर्चा आणि टीका** : धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ हा कायदा लागू करताना त्यावर विविध स्तरांवर चर्चा आणि वादही झाले आहेत. काहींच्या मते हा कायदा जबरदस्तीच्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी आवश्यक आहे तर काही सामाजिक आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या मते, या कायद्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्यावर परिणाम होऊ शकतो. विशिष्ट समुदायावर अन्याय करणारा ठरू शकतो. अशा अनेक चर्चा, टीका केल्या गेल्या. एकूणच धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ या कायद्यातील तरतुदी समाजात धार्मिक समतोल राखण्यासाठी आणि व्यक्तींच्या स्वेच्छेचा आदर करण्यासाठी करण्यात आल्या आहेत. मात्र, धर्म हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने अशा प्रकारच्या टीकांकडे दुर्लक्ष करीत कायद्यांचं आसूड उगारलं गेलं आहे. कोणीही कोणाच्या धार्मिक बाबींमध्ये ढवळाढवळ केली नाही तर हा कायदा समाजात धार्मिक सलोखा राखण्यास मदत करू शकतो. परंतु, कोणी जर सामाजिक तणाव वाढण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला सोडले जाणार नाही, सरकार, पोलिस त्याच्यासोबत न्याय केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'अब होगा न्याय' म्हणायला हरकत नाही.

९२७०३३३८८६

---

## वाचक पत्रे

### 'आमचं पुणं' बहरणार

खूप वर्षांनी 'तरुण भारत' वाचण्याचा आनंद मिळाला. योग्य विचारांनी दिशादर्शन करणारे दैनिक पुण्यात हवेच होते. पहिल्याच पानावर विचारपुष्प, आतील पानावर संघगीत, संघ नोंदी वाचून समाधान वाटले. कै. रामभाऊ म्हाळगी यांचे स्मरण वाचून तरुण भारत परिवारात आल्याबद्दल धन्यता वाटली. 'आमचं पुणं' हळूहळू बहरत जाणार, ही खात्री आहेच. 'धर्म अध्यात्म'मधील लेख उत्तम! कला, क्रीडा, अध्यात्म, अर्थकारण, राजनीती या सर्व क्षेत्रांचा रोज परिचय करून देणारा 'तरुण भारत' आयुष्याचा अविभाज्य भाग बनणार, हे नक्की! खूप शुभेच्छा!

**प्रशांत दिवेकर** /तळेगाव दाभाडे, पुणे

### तरुण भारत पुणेचे स्वागत

साधारण ४०-४२ वर्षांपूर्वी पुणे तरुण भारत बंद झाला. तरुण भारतबरोबर विदर्भात असताना चांगला संबंध होता. रोज तरुण भारत वाचायला मिळायचा. १९७६ मध्ये पुण्यात आलो. त्यानंतर खंडित झालेला तो आपुलकीचा संबंध आता पुन:प्रस्थापित झाला, याचा मनस्वी आनंद होत आहे. मला आठवते की, १९५७-५८ ला वर्धा येथे तरुण भारत वाचायला सुरुवात झाली. मधील काही वर्षे मध्यप्रदेशात गेल्याने खंड पडला. तो पुढे यवतमाळ येथे आल्यावर सुरू झाला तो थेट १९७६ पर्यंत. आणिबाणी लागली त्याचे दुसऱ्या दिवशीचा पेपर अजूनही आठवतो. त्या काळात नरकेसरी प्रकाशनने अद्ययावत यंत्रणा आणली होती. आता तरुण भारताची पुणे आवृत्ती सुरू झाली आहे. जाहिरातविरहित वृत्तपत्र वाचताना छान वाटले, पण जाहिराती हा वृत्तपत्राचा आर्थिक कणा आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**प्रदीप महाबळे**/पाषाण, पुणे

### भारताचे संकटमोचक

यावर्षीच्या टी-२० पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आपल्या टीम इंडियाचा प्रवास अडखळत सुरू आहे. सुदैवाने प्रत्येक सामन्यात एखादा फलंदाज आपल्या टीमला संकटातून बाहेर काढतो. पहिल्या अमेरिकेसोबतच्या सामन्यात सूर्य तळपला नसता तर आपला पराभव अटळ होता. दुसऱ्या सामन्यात नामिबियासमोर ईशान-हार्दिक वगळता आपली फलंदाजी बहरली नाही. अडीचशेही करू शकलो नाही. पाकिस्तानला आपल्या गोलंदाजांनी १८ षटकांत ११४ धावांवर रोखल्यामुळे आपण विजय साजरा करू शकलो. नेदरलँडसविरुद्ध खेळताना शिवम दुबेची तडाखेबंद खेळी विजयी करून गेली. गटातील चारही टीमसोबत मिळालेला विजय लौकिकास साजेसा नव्हता. सुपर आठच्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आपला दारुण पराभव केला. आपला पूर्ण संघ केवळ १११ धावा करू शकला. सुपर आठच्या दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना आपण हिमतीनं सामोरे गेलो आणि प्रथमच अडीचशे धावा करून विजय मिळविला. बलाढ्य वेस्ट इंडीजला १५५ धावांवर रोखल्यानंतर आपली फलंदाजी परत एकदा ढेपाळली. संजू सॅमसनच्या जबाबदार खेळीने उपांत्य फेरी गाठता आली.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### मनालाही पटत नाही आणि जनतेलाही; तरीसुद्धा.!

पक्षश्रेष्ठी जनतेला न पटणारे निर्णय का घेतात, हे कळले नाही. आता हेच बघा ना, राज्यसभेच्या निवडणुकीत पुन:पुन्हा त्याच त्या नेत्यांची वर्णी लागावी. काय म्हणावं याला? पक्षांकडे तरुण, तडफदार,अभ्यासू नेतृत्वाचा दुष्काळ पडला आहे काय? जे उत्तम प्रकारे राज्यसभा गाजवू शकतात, सर्व क्षेत्रातील समस्या राज्यसभेत मांडून त्या सोडविण्याचं सामर्थ्य आहे अशा सामर्थ्यवान नेतृत्वाला पक्षाकडून नारळ आणि जनतेला ज्या नेतृत्वात मुळीच रस नाही अशांना पक्षाची कवच कुंडले! ज्या कवच कुंडलांचे ते स्वतंत्रपणे रक्षणही करू शकत नाही आणि पावित्र्यही राखू शकत नाही. अशा नेत्यांना राज्यसभा. पात्र असलेल्या दावेदार नेत्यांना ग्रामसभा.आहे.

**विजय इंगोले**/बडनेरा

### 'हे आव्हान सोपे नाही'

'रोखठोक'मधील दिनेश गुणे यांचा 'हे आव्हान सोपे नाही' लेख आशयघन असून सर्वांना जागे करणारा आहे. ७० च्या दशकांपासून या अमली पदार्थांच्या व्यसनाची चर्चा सुरू झाली. सर्व प्रकारचे अमली पदार्थ येथे सहजगत्या उपलब्ध होतात. कारण त्यांची साखळी असते. आपल्या देशातील तरुण पिढीचा असा सत्यानाश करायला लावतात तेव्हा ते किती जाड कातडीचे असतात, हे लक्षात येते. सातत्याने अमली पदार्थ पकडल्याच्या बातम्या येतात. तरीही अमली पदार्थांची विक्री चालूच आहे हे वास्तव आहे. त्यामुळेच अमली पदार्थ मिळू नयेत यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी राजकीय व प्रशासकीय कणखर इच्छाशक्ती हवी. हे आव्हान सोपे नाहीच, पण अशक्यही नाही.

**माया हेमंत भाटकर** /पुणे-९८६९०७४४९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## भटक्या जमातीतील पोतराज भर उन्हात कोड्याने (चाबूक )मारून घेऊन भिक्षा मागताना



तभा. वृत्तसेवा

**बीड |** भटक्या जमातीतील एक जमात पोतराज दि. ७ मार्च २०२६ रोजी नगर रोडवर भर उन्हात मीरा आईच्या तथा कडक लक्ष्मीच्या नावे भक्ती भावाने स्वतःला कोड्याने (चाबूक )मारून घेऊन भिक्षा मागताना जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला दिसले असता, पोतराज दांपत्याशी विशेष करून महिलेशी सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे यांनी संवाद साधला असता कोठे नेऊन ठेवला आपला महाराष्ट्र असेच मनाला वाटले.

## कु. गर्गे नंदिनी नारायणचे राज्यस्तरीय नेतृत्त्व गुणविकास शिबिरात यश



**बीड |** सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. गर्गे नंदिनी नारायण हिने पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे येथे प्रेरणा २०२५-२६ राज्यस्तरीय नेतृत्त्व गुणविकास शिबिरामध्ये सक्रिय सहभाग नोंदविल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.कु.नंदिनी गर्गे हिच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. के.मुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे व प्राध्यापक उपस्थित होते.

## वधु वर परिचय मेळाव्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान काळाची गरज : प्रा. सुशीलाताई मोराळे

**बीड (प्रतिनिधी) |** मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर,वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु-वर परिचय मेळावा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंताचा राज्यस्तरीय मातृभूमी रत्न पुरस्कार गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थित मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे संपन्न झाला. मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक,ॲड.जयंत राख, प्रा.आर.टी. गर्जे,डॉ. वसंत मुंडे प्रा. ज्ञानेश्वर वाघ, ऊसतोड कामगार ज्येष्ठनेते गहिनीनाथ दादा थोरे पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, मंडळ अधिकारी शितल चाटे ,मोहनराव शिरसाट, उत्तमराव मिसाळ आदींची उपस्थिती होती.

# महसूल 'महाराजस्व समाधान' शिबिराचा सामान्य जनतेला मोठा फायदा - राजेंद्र मस्के



तभा. वृत्तसेवा

**बीड, प्रतिनिधी |** सामान्य नागरिकांना सातबारा उतारा, उत्पन्न प्रमाणपत्र, वारसा नोंद अशा विविध महसुली कामांसाठी तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. अशा कामांसाठी वेळ आणि खर्च दोन्ही लागतात, जे सामान्य माणसाला परवडणारे नसते. या अडचणी दूर करून नागरिकांना थेट सेवा देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा ग्रामीण व सर्वसामान्य जनतेला निश्चितच मोठा फायदा होत असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला.

बीड तहसील कार्यालय व महसूल मंडळ पाली यांच्या वतीने बायपास रोड, बीड येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्व समाधान शिबिरात ते बोलत होते. या शिबिरात बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते महसूल विभागाशी संबंधित विविध प्रमाणपत्रे व आदेशपत्रांचे वाटप करण्यात आले.

यामध्ये जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, वारसा प्रमाणपत्र, घरकुलासाठी पाच ब्रास वाळूचे आदेशपत्र, विवादित पानंद रस्त्यांबाबत तडजोड पत्र, घरकुल योजनेची मंजुरीपत्रे आदी कागदपत्रांचे वितरण करण्यात आले.

या शिबिरास निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, तहसीलदार चंद्रकांत शेळके, तालुका कृषी अधिकारी साळी, नायब तहसीलदार सुहास हजारे, सुरेंद्र डोके, जाधववर, अण्णासाहेब वंजारे, गटविकास अधिकारी सानप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात जिवंत व डिजिटल सातबारा वाटप, वारस फेरफार, वर्ग-१ ते वर्ग-२ रूपांतरण, पाच ब्रास वाळू वाटप, उत्पन्न, जात व रहिवासी दाखले वाटप, ॲग्रीस्टॅक ई-पिक पाहणी, ई-चावडी अंतर्गत ई-वसुली पावत्या, सेवामित्र व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे, पानंद रस्ते नोंदी, ई-केवायसी प्रक्रिया, आधार कॅम्प, ई-शिधापत्रिका वाटप, लक्ष्मी मुक्ती योजना लाभ, अकृषक व भूसंपादन संदर्भातील आदेश, डीबीटी आदेश वाटप, रक्तदान शिबिर, अभिलेख दुरुस्ती, मोफत आरोग्य तपासणी आदी उपक्रम राबविण्यात आले.

तसेच घरकुल मंजुरी आदेश, गायगोठा मंजुरी, "मागेल त्याला शेततळे" योजनेचे आदेश, तसेच कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टलवरील योजनांचे संगणकीकरण यांसारख्या विविध योजनांवर प्राधान्याने कार्यवाही करून अनेक प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात आला.

ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या सेवा थेट व जलद मिळाव्यात, हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश असून अशा उपक्रमांमुळे शासन व जनतेतील दुवा अधिक मजबूत होत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# 'प्रति देहू' श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळा संपन्न



तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी |** श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन यावेळी पार पडले.

तुकोबा, विठोबा आणि ज्ञानोबा यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. परिसरातील अनेक गावच्या पालख्या या ठिकाणी दाखल झाल्या होत्या. पंचक्रोशीसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने भक्त समुदाय श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावन धाम येथे दर्शनासाठी दाखल झाला होता.

अल्पावधीतच "प्रति देहू" म्हणून ओळख निर्माण केलेले हे पावनधाम भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. यावेळी बोलताना ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले की, "पावनधाम संस्थान हे सर्वांचे आहे. संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर चालणारी ही संस्था आज सर्वांच्या श्रद्धेचे स्थान बनली आहे. ज्या भाविकांना देहू येथे जाता येत नाही, अशा भाविकांना येथे साक्षात तुकोबारायांचे दर्शन घेण्याची संधी मिळते."

या कार्यक्रमानिमित्त उद्योजक नामदेव इंदरराव गोरे यांनी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचक्रोशीतील स्वयंसेवकांनी तब्बल सात दिवस अहोरात्र मेहनत घेतली.

ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा अत्यंत भक्तिभावाने पार पडला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून संत तुकाराम महाराजांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

## ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मध्ये IEDSSA अंतर्गत मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वी



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव, प्रतिनिधी |** ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे IEDSSA अंतर्गत आंतर विभागीय मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. दि. २ व ३ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा, प्रा. डॉ. सुदर्शन स्वामी, पत्रकार उमेश जेथलीया, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, क्रीडा शिक्षक सुलतान सर यांच्या उपस्थितीत होते. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट संघभावना, शिस्त आणि क्रीडाभावना दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली. व्हॉलीबॉल व बास्केटबॉल या दोन्ही स्पर्धांमध्ये चुरशीचे सामने रंगले.

होळी व धुलिवंदन सणांच्या पार्श्वभूमीवर स्पर्धा पार पडत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे स्पर्धा शांततेत आणि सुरळीत वातावरणात यशस्वीरीत्या पार पडल्या.

संस्थेचे प्राचार्य यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करून सर्व सहभागी खेळाडू, क्रीडा शिक्षक व आयोजन समितीचे कौतुक केले. अशा प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि क्रीडाभावना वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## पशुसंवर्धनातून आर्थिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त करणारा हा अर्थसंकल्प : पंकजा मुंडे

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ |** राज्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी वैजनाथ येथील महापशुधन एक्सपोत प्रस्तावित केलेल्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजने'ला राज्य सरकारने मंजुरी दिली असून याबाबतची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली आहे.

ग्रामीण भागात पशुपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच इतर पशुधन आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील युवक, महिला आणि शेतकरी यांना पशुधन व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने सुरू असलेल्या 'गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजने' ची व्याप्ती वाढवून शेतमजुरांनाही या सुरक्षा कवचाखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अपघाती प्रसंगी शेतमजुरांच्या कुटुंबालाही आर्थिक मदत मिळणार आहे. याशिवाय महिला गोपालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालक यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडलेल्या या उपक्रमांमुळे ग्रामीण भागात पशुधन उद्योगाला चालना मिळून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून परळी वैजनाथ येथे झालेल्या देशपातळीवरील महा पशुधन एक्स्पोच्या समारंभात पंकजाताई मुंडे यांच्या कामाचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले होते. तसेच येणाऱ्या काळात पंकजाताई मुंडे यांच्याकडून पशुसंवर्धन विभागाच्या ज्या ज्या योजना व प्रस्ताव दिले जातील ते सर्व मंजूर करून भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला होता. या अनुषंगानेच या अर्थसंकल्पात पंकजाताई मुंडे यांनी प्रस्तावित केलेली महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच पशुसंवर्धन विभागासाठीही भरघोस निधी आणि प्रोत्साहनपर अनेक योजनांची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पशुसंवर्धनातून ग्रामीण भागाची आर्थिक गती वाढविण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाबद्दल ना पंकजाताई मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## उद्योगविश्वात आदित्य पॉलिटेक्निकची दमदार झेप; विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम

### वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनासह विद्यार्थ्यांनी औद्योगिक सुरक्षिततेचे नियम घेतले जाणून



तभा. वृत्तसेवा

**बीड |** विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम तांत्रिक शिक्षणाला उद्योग क्षेत्राची प्रत्यक्ष जोड देण्याच्या उद्देशाने बीड येथील आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत जयसिंगपूर व शिरोळ (जि. कोल्हापूर) येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. या भेटीत विद्यार्थांनी वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनासह औद्योगिक सुरक्षिततेचे नियम जाणून घेतले.

औद्योगिक भेटीची संकल्पना संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. विद्यार्थ्यांनी श्रीराम इलेक्ट्रिकल लिमिटेड, जयसिंगपूर येथे कॅपॅसिटर निर्मिती प्रक्रियेचे सखोल निरीक्षण केले. कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी पद्धती, विविध तांत्रिक चाचण्या, औद्योगिक सुरक्षिततेचे नियम यांची माहिती तज्ज्ञांकडून देण्यात आली. विद्यार्थ्यांना पॉवर फॅक्टर सुधारणा, रिॲक्टिव्ह पॉवर व्यवस्थापनाचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले.

> विद्यार्थ्यांनी उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव घेतल्यास त्यांची संकल्पना अधिक स्पष्ट होते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे अशा प्रकारचे उद्योगाभिमुख उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.
>
> -डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था, बीड

यानंतर विद्यार्थ्यांनी वसंत इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मर मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड येथे ट्रान्सफॉर्मर कोअर असेंब्ली, एलव्ही व एचव्ही वाइंडिंग, व्हॅक्युम ऑईल फिलिंग प्रक्रिया, इन्सुलेशन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. टेस्टिंग लॅबमध्ये शॉर्ट सर्किट टेस्ट, रेशो टेस्ट, इन्सुलेशन रेसिस्टन्स टेस्ट यांचे प्रात्यक्षिक पाहिले. विद्यार्थ्यांचा तांत्रिक आत्मविश्वास वाढला. तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी श्रीदत्त पावर प्लांट, शिरोळ येथे को-जनरेशन पद्धतीद्वारे वीज निर्मितीची संपूर्ण साखळी समजून घेतली. बॉयलरमधील वाफ निर्मिती, टर्बाईनची कार्यप्रणाली, जनरेटर समक्रमण, कंट्रोल रूममधील डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. उद्योगातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. करिअर संधी, शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले.

या औद्योगिक भेटीस संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा, प्राचार्य डॉ. राहुल खडके, विभागप्रमुख प्रा. जाधव डी.एम. तसेच प्रा. शहाणे एस.बी., प्रा. कांबळे पी.व्ही. व प्रा. वीर ए.एम. यांचे मार्गदर्शन लाभले.

# भगवंत उदार अंतःकरणाचा आहे – ह.भ.प. राजेन महाराज भोसले



तभा. वृत्तसेवा

**बीड |** प्रतिनिधी : नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी येथे दि. ५ मार्च २०२६ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ व त्रिदिनी कीर्तन महोत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यानिमित्त ह.भ.प. राजन महाराज भोसले यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले.

आपल्या कीर्तन सेवेत त्यांनी प्रतिपादन केले की, भगवंत हा उदार अंतःकरणाचा असून तो आपल्या भक्तांचे रक्षण करतो, त्यांना सांभाळतो आणि त्यांच्या जीवनातील अनिष्ट दूर करून शेवटी मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवतो.

श्रीमद् भागवत कथा संपन्न

खर्डेवाडी येथे ह भ प भागवत कथा प्रवक्ते रामचंद्र महाराज जगताप यांच्या संगीत श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यां सात दिवसांत भाविकांनी मोठ्या श्रद्धेने व भक्तीने भागवत कथा श्रवण केली. या बीज उत्सवानिमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले. या कीर्तन महोत्सवात ह.भ.प. श्रीनिवास महाराज जगताप, ह भ प नारायण महाराज शिरसट तसेच ह.भ.प. डॉ. केशवदास महाराज वैष्णव यांची हरिकीर्तन सेवा संपन्न झाली.

हरिपाठ

या बीज उत्सवानिमित्त व श्रीमद संगीत भागवत कथा , किर्तन महोत्सव आणि दररोज सायंकाळी पाच ते सहा या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा संगीत हरिपाठ नित्यनेमाने मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला या हरीपाठासाठी गावातील बहुसंख्येने भाविक उपस्थिती लावून आनंद घेतला. त्या,बरोबरच फुगड्याचा

ही आनंद भावीकभक्तांनी घेतला

"जगद्गुरु संत तुकाराम महाराज आपल्या घरी"

या उपक्रमांतर्गत ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथेचे अभ्यासक ह भ प हरिदास सोळंके महाराज गुरुजी ,यांच्या मार्गदर्शनाखाली या भागवत कथेमध्ये साधकांना तुकाराम महाराज गाथा ग्रंथ भेट देण्यात आले.

या सोहळ्यानिमित्त कळेकर परिवारांनी आयोजित केलेल्या श्रीमंत संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात किसन बाबा कळेकर याची पुण्यतीथी, रत्नदीप कळेकर यांचे पुण्यस्मरणही साजरे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन सौ. वृंदावनी महादेव साळुंके, प्रशांत कळेकर व कळेकर परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास समस्त ग्रामस्थ खर्डेवाडी, धावज्याचीवाडी, पांढरेची वाडी, तांदळवाडी, यांचे मोलाचे योगदान लाभले सर्वांच्या सहकार्यातून कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाला

केज, बीड, कवडगाव, नांदूर, खरडेवाडी, धावजेवाडी, येळंब, वांगी,परळी,व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला. शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले यांना "मातृभूमी समाजरत्न" पुरस्कार



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी ) |** कामगार, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरणारे इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले यांना राज्यस्तरीय "मातृभूमी समाजरत्न" पुरस्काराने गौरविण्यात आले. संघर्षातून नेतृत्व सिद्ध करणाऱ्या जमाले यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मातृभूमी प्रतिष्ठान आयोजित भव्य सोहळ्यात प्रमुख मान्यवर मंडळ अधिकारी शितल चाटे, उद्योजक उत्तमराव मिसाळ, प्रा.ज्ञानेश्वर वाघ,डॉ. वसंत मुंडे डॉ. संजय तांदळे यांच्या हस्ते रामधन जमाले यांना सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी जमाले यांच्या धडाडीच्या नेतृत्वाचे आणि निर्भीड भूमिकेचे कौतुक केले.

जिल्ह्यातील कामगार प्रश्न, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हक्क, शासकीय योजनांतील त्रुटी, तसेच विविध विभागांतील अनियमिततेविरोधात जमाले यांनी मोर्चे, धरणे, निवेदने आणि पत्रकार परिषदांच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठवला आहे. प्रशासनाच्या चुकीच्या धोरणांवर त्यांनी उघडपणे टीका करत जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यामुळे जिल्ह्यात संघर्षशील नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# जिल्ह्यात १३ हजार २८८ मुलींना मोफत देणार कर्करोगावरील सुरक्षा लस

## मुलींना मोफत लस घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

दैनंदिन जीवनात बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये कर्करोगाचा धोका वाढत असताना, सार्वजनिक आरोग्य विभागाने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध घालण्यासाठी कंबर कसली आहे. राज्य शासनाच्या निर्देशनुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली १४ वर्षे पूर्ण झालेल्या पण १५ वा वाढदिवस साजरा न केलेल्या (जन्म तारीख ८ मार्च २०११ ते ७ मार्च २०१२ या कालावधीत जन्मलेल्या) जिल्ह्यातील सुमारे १३ हजार २८८ किशोरवयीन मुलींना गर्भाशयाच्या मुख कर्करोगावरील (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधात्मक लस मोफत दिली जाणार आहे.

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात जिल्हा प्रशासनमार्फत एचपीव्ही सुरक्षित लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. ही लस पूर्णत: सुरक्षित असून, या लसीमुळे भविष्यात मुलींना गर्भाशय मुख कर्करोग होणार नाही. या मोहिमेचा जिल्ह्यातील सुमारे १३ हजार २८८ मुलींना थेट फायदा होणार आहे. सर्व पालकांनी या मोहिमेमध्ये आपल्या मुलींना ही लस द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने पालकांना केले आहे.

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमधील दुसऱ्या क्रमांकाचा जीवघेणा आजार ठरत आहे. खासगी रुग्णालयांत या एका लसीसाठी जवळपास १० हजार रुपये मोजावे लागतात. त्यामुळे ही लस सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. हीच लस आता जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्येच आयुष्यमान आरोग्य मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत विनामूल्य मिळणार आहे. ही लस घेतल्यास कर्करोगाचा धोका ९९ टक्क्यांनी कमी होतो.

गर्भाशय कर्करोग : वेळीच सावधनता बाळगावी

अस्वच्छता, असुरक्षित संबंध आणि हार्मोनल बदलांमुळे महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग वाढतोय. सध्या हा आजार महिलांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. हा आजार झाल्यावर उपचार करण्यापेक्षा वयाच्या १४ ते १५ व्या वर्षी 'एचपीव्ही' लस घेणे हाच सर्वोत्तम प्रतिबंधात्मक उपाय आहे. सरकारी रुग्णालयात मोफत उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील मुलींनाही या महागड्या लसीचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे भविष्यातील पिढी आरोग्यदायी राहील. त्यामुळे किशोरवयीन मुलींच्या पालकांनी ही लसीकरण करून घ्यावे. ही लस एकदम सुरक्षित असून, जगात जवळपास ८० देशात ही लस किशोरवयीन मुलींना यशस्वी दिलेली आहे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी केले आहे.

मोहीम यशस्वी राबवण्यासाठी सर्व डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, वैद्यकीय अधिकारी यांच्या देखरेखखाली प्रशिक्षित स्टाफमार्फत फक्त आरोग्य संस्था, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयामध्येच दिली जाणार आहे.

हे एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक आहे. लसीकरणासाठी पालकाची संमती अनिवार्य असून, ती यु-विन पोर्टलवर डिजिटल स्वरुपात किंवा इंटरनेट नसल्यास लेखी स्वरुपात घेतली जाईल. लसीकरणानंतर डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईने चिन्ह केले जाईल.

मुलींनी उपाशीपोटी लस घेऊ नये; पालकांनी त्यांना नाश्ता देऊन लसीकरणासाठी पाठवावे, लसीकरणानंतर किमान ३० मिनिटे निरीक्षणाखाली थांबणे आवश्यक आहे. ही लस अत्यंत सुरक्षित आहे, अशी माहीती जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ सतीश रूणवाल यांनी दिली आहे.

# लिगो इंडिया प्रकल्पातील विकास कामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**



जिल्ह्यातील दुधाळा येथे चार वर्षाच्या कालमर्यादेत गुरुत्वाकर्षण-लहरींचा अभ्यास करणारी अत्याधुनिक वेधशाळा 'लिगो इंडिया' अंतर्गत येणाऱ्या विविध विकासप्रकल्पांचा आढावा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज येथे घेतला. यावेळी लिगो इंडिया या प्रकल्पाच्या विकासाकामांची प्रगती ही समाधानकारक असून, विहित कालावधीत कामे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधितांना दिले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) राजेश सरवदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुदेश देशमुख, तहसीलदार हरिष गाडे, लिगो इंडियाचे संचालक के. महापात्रा, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख प्रशांत बिलोलीकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता एन. डी. कोकडवार यांच्यासह लार्सन अँड टुब्रोची टेक्निकल टीम यावेळी उपस्थित होते.

अमेरिका-भारत-जर्मनी-ऑस्ट्रेलिया-यूके यांच्या सहकार्याने पुढील चार वर्षांत बांधण्यात येत असलेल्या या प्रकल्पासाठी लागणारे अतिरिक्त भूसंपादन करण्याच्या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक पार पडली. या प्रकल्पाच्या कामकाजासाठी आवश्यक भूसंपादन मोजणी पुढील सात दिवसांमध्ये करण्याचे संबंधित यंत्रणेला निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. लिगो इंडिया या प्रकल्पातून यापूर्वी गेलेल्या विविध नागरी सुविधांचे कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणांनी त्या सोयी-सुविधा प्रकल्पाच्या बाहेरील परिसरातून वळविण्यात याव्यात. तसेच या कामासाठी लागणाऱ्या अतिरिक्त भूसंपादनाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

औंढा नागनाथ तालुक्यातील दुधाळा येथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाचे काम २०३० पर्यंत पूर्ण होऊन तो प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. हा प्रकल्प जगातील सर्वात संवेदनशील इंटरफेरोमीटरपैकी एक राहणार असून, तो खगोल भौतिकशास्त्रातील संशोधनाचे एक प्रमुख केंद्र असेल. भविष्यात या प्रयोगशाळेतून वैश्विक घटनांमुळे निर्माण होणाऱ्या गुरुत्वाकर्षण लहरींचा शोध घेता येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

भारताचा अणुऊर्जा विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग युनायटेड स्टेट्समधील लिगो प्रयोगशाळेच्या सहकार्याने या प्रकल्पावर काम सुरु आहे. जगभरातील लिगो वेधशाळांच्या जागतिक नेटवर्कमध्ये हे पाचवे राहणार आहे. हा प्रकल्प खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्रातील भारताच्या क्षमता वाढवेल आणि तरुणांना या क्षेत्रात संशोधन करण्यास प्रेरित करेल. त्यामुळे या प्रकल्पाची सर्व प्रकिया तात्काळ पूर्ण करण्याबाबत आढावा घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# एबीएम स्कूलच्या विद्यार्थ्यांची राज्य राखीव दलाला क्षेत्रीय भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**



शहरातील ए बी एम इंग्लिश स्कूल येथील इयत्ता चौथी ते दहावी च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट राज्य राखीव पोलिस बल हिंगोली येथे आयोजित करण्यात आली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना सुरक्षा दलाचे कार्य, शिस्त व देशसेवेबद्दल माहिती देणे हा होता.

या प्रसंगी राज्य राखीव पोलीस बल अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या शस्त्रांचे प्रदर्शन आयोजित करून व त्यांची शास्त्रशुद्ध माहिती दिली. शस्त्रांचा वापर कसा केला जातो, देशाच्या सुरक्षेसाठी त्यांचे महत्त्व काय आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध शस्त्रांची माहिती घेतली.

या शैक्षणिक भेटीद्वारे विद्यार्थ्यांना पोलीस दलाचे कार्य प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. शाळेच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ही भेट यशस्वीरीत्या पार पडली. ही भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली. या शैक्षणिक क्षेत्रभेट अभ्यास उपक्रमासाठी अध्यक्ष दिलीप बांगर, संचालक अजिंक्य बांगर, प्राचार्य रॉबिन वर्गीस यांची उपस्थिती होती. शाळेतील शिक्षक वृंद यांनी या क्षेत्रभेट अभ्यास उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

# भाजपकडून आज खा. रामराव वडकुते यांच्या जंगी स्वागताची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**



भारतीय जनता पक्षाच्यावतीने रामराव वडकुते यांची नुकतीच राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीनंतर त्यांचे स्वागताची जय्यत तयारी भाजपकडून करण्यात आली असून दि ८ मार्च रोजी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी स्वागत करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, मिलींद यंबल, उमेश नागरे, उमेश गुठ्ठे, कैलाश शहाणे, राजु यादव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित असणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### माजी कुलगुरू जनार्दन वाघमारे यांना श्रध्दांजली



हिंगोली- येथील के रंभाबाई रामचंद्र बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयात डॉ.जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मरणार्थआपले विचार मांडले. भ. मा.परसवाळे, अशोक अर्धापूरकर, प्रा.दत्ता सावंत, संजय टाकळगव्हाणकर, कलानंद जाधव यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमास खंडेराव सरनाईक, प्रा.जी पी मुपकलवार गजानन शिंदे, नामदेव बुद्रुक, प्रा तुकाराम हापगुंडे, प्रा.राजेश गोटे प्रा. विजय वाघ, प्रा. भगवान गुट्टे, प्रा.अरविंद नाईक, संतोष ससे हे उपस्थित होते.

### पवार पब्लीक स्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा



हिंगोली- भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस हा चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी पवार पब्लिक स्कूल हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रोजेक्ट, मॉडेल आणि विविध विज्ञान प्रदर्शन सादर करून हा दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी पवार पब्लिक स्कूलचे सर्वेसर्वा प्रणव शिवाजीराव पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. याप्रसंगी कोमल अग्रवाल, फिजा सय्यद, के सी सोली, सचिन धामणे, अपर्णा मुळे, दिपाली राऊत, अश्विनी सराफ, दिपाली मुदिराज, छाया धनवे, रुपाली ठाकरे, गजानन वानरे, योगेश थोरात, पंकज इंगोले, जोबिन जॉर्ज, सचिन इंगोले, कपिल मस्के, संतोष पाईकराव, विकास महानुर, वैभव काळे आदींची उपस्थिती होती.

### एनएमएमएसमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

हिंगोली- येथील श्रीमती शांताबाई दराडे विद्यालयातील ३४ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाले असून चार विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत. शनिवारी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

# कत्तलखान्यात जाण्यापूर्वीच ५ जनावरे बाळापूर पोलिसांनी घेतली ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

वसमत तालुक्यातील कुरूंदा येथून जवळा पांचाळ येथे कत्तलखान्यात नेली जाणारी पाच जनावरे आखाडा बाळापूर पोलिसांनी पकडली आहेत. याप्रकरणी एका तरूणाविरूध्द आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही जनावरे गो शाळेत सोडण्यात आली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील कुरूंदा भागातून एका पिकअप वाहनामध्ये पाच गोवंशीय जनावरे दाटीवाटीने कोंबून जवळा पांचाळकडे कत्तल खान्यात नेली जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. या माहीतीच्या आधारे आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, उपनिरीक्षक गणेश घोटके, जमादार संतोष नागरगोजे, विठ्ठल जाधव यांच्या पथकाने कुरूंदा ते जवळापांचाळ मार्गावर वाहनांची तपासणी सुरू केली होती.

यावेळी एक पिकअप वाहन जवळापांचाळ शिवारात आले असतांना पोलिसांनी सदर वाहन थांबवून चालक शेख अय्याज शेख हबीब रा कुरूंदा याच्याकडे चौकशी सुरू केली मात्र पोलिसांना पाहताच त्याचा समाधानकारक उत्तरे देता आली नाही. पोलिसांनी वाहनांची तपासणी केली असता त्यात पाच गोवंशीय जनावरे आढळून आली. याबाबत विचारणा केली असता चालक शेख अय्याज याने जनावरे नातेवाईकांकडे नेत असल्याचे सांगितले. मात्र जनावरांचा दाखला तसेच वाहतूक परवाना त्याच्याकडे नव्हता. यामुळे पोलिसांनी पिकअप वाहन व पाच जनावरे असा ४ लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी जमादार जाधव यांच्या तक्रारीवरून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमादार संतोष नागरगोजे पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी सदर जनावरे तोंडापूर येथील गोशाळेत सोडली असल्याचे सांगण्यात आले.

# ज्येष्ठ पत्रकार बालाजी पाठक यांचे निधन मरणोत्तर केले देहदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**



शहरातील जेष्ठ पत्रकार बालाजी दत्तोपंत पाठक (वय वर्ष ५८) यांचे आज शनिवारी दि ७ मार्च रोजी सकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तिव्र धक्क्याने दुखद निधन झाले आहे. त्यांनी मरणोत्तर त्यांचे देहदान करण्याचा संकल्प घेतला होता. त्यानुसार येथील वैद्यकीय महाविद्यालयात त्यांच्या कुटुंबियांकडून त्यांचे देहदान करण्यात येणार आहे. प्रेस फोटाग्राफर सुनील पाठक यांचे ते थोरले बंधू होत.

मागील ३० वर्षापासून बालाजी पाठक यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीयामध्ये उत्कृष्ट पत्रकारीता केली. सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अनेक प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी पत्रकारीतेचा वापर केला. जिल्ह्यातील एक ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा डॉ. मयुर पाठक,मुलगी डॉ.वैष्णवी पाठक, सुन नातू यासह भाऊ प्रेस फोटोग्राफर तथा पत्रकार सुनिल पाठक

हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी कणखर पत्रकारिता पत्रकरीता करणारे आणि स्वतंत्र ओळख जपणारे व्यक्तिमत्व बालाजी पाठक व्यक्तीमत्व होते. शहराच्या सामाजिक चळवळीत मोठे योगदान त्यांचे होते. त्यांच्या अंत्य दर्शनासाठी सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी व्यापारी, पत्रकार, डॉक्टर्स, वकील, प्रतिष्ठीत नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी गर्दी केली होती. सायंकाळी पाच वाजता वैद्यकीय महाविद्यालयाला स्व. बालाजी पाठक यांचे देहार्पनण करण्यात आले.

# आखाडा बाळापूर हद्दीत जुगार अड्ड्यावर छापा ११ जुगाऱ्यांसह अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**



हिंगोली जिल्हा हद्दीतील अवैध धंद्याचा शोध घेऊन समुळ उच्चाटन करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी वारंवार सूचना देत असून त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस स्टेशनचे पथक वेळोवेळी कार्यवाही करीत आहे. पोलीस स्टेशन बाळापुर हद्दीत डोंगरकडा फाटा येथे सखाराम अडकिने यांच्या शेतातील आखाड्यावर झन्ना मन्ना नावाचा जुगार चालू आहे अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशनच्या पथकांनी छापा मारला असता

सदर ठिकाणी राजेश गेंदुलाल जैस्वाल वय ५८ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी जि. हिंगोली, देवानंद प्रभु सरोदे वय ५४ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी, दुर्गादास बापुराव अडकिणे वय ५२ वर्षे रा. डोगरकडा ता. कळमनुरी, किसन तुकाराम गावंडे वय ७२ वर्षे रा. डोगरकडा ता. कळमनुरी, शिवलाल किसन राठोड वय ६० वर्षे रा. वरूड तांडा ता. कळमनुरी, बालाजी भिमराव गावंडे वय ३४ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी, दिलीप माधवराव कुरूंदकर वय ४५ वर्षे रा. वरूड तांडा ता. कळममनुरी, सुरज खुबा पवार वय ४० वर्षे रा.झुनझुनवाडी ता. कळमनूरी,मधुकर रामराव गावंडे वय ६० वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी, प्रकाश खिरू राठोड वय ५७ वर्षे रा.भाटेगाव ता. कळमनुरी, मोहन कचरू राठोड वय ३९ वर्षे रा. भाटेगाव ता. कळमनुरी जि. हिंगोली या इस्मानी अवैधरित्या यांना जुगार खेळत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यातुन रोख रक्कम, नऊ मोबाईल, तीन मोटरसायकल असा २ लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन बाळापुर येथे गुन्हा दाखल करण्यात करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नीलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे सपोनि विष्णुकांत गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, आमलदार नागरगोजे पोलीस अंमलदार जाधव, हरिभाऊ गुंजकर आकाश टापरे, साईनाथ कंटे, नरेंद्र साळवे, ज्ञानेश्वर गोरे यांच्या पथकाने केली आहे.

# आश्विन अंभोरे याने सादर केला गांडूळ खतावर आधारीत प्रकल्प



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

इयत्ता सहावीतील विद्यार्थी अश्विन आबासाहेब अंभोरे डॉक्टर होमी बाबा संस्थेमध्ये प्रकल्प सादर केला आहे. त्यात त्याने गांडूळ खतामुळे शेतीला होणारे फायदे याविषयी माहीती सादर करीत शेतकऱ्यांना आवाहन केले आहे. डॉ. होमी बाबा संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या माध्यमातून प्रकल्प सादरीकरणासाठी अश्विन अंभोरे यांची निवड झाली आहे. या प्रकल्पासाठी त्याने कृषिरत्न पुरस्कार प्राप्त शेतकरी बाबाराव पडोळे रा. जडगाव यांच्या शिवछत्रपती डेरी फार्म येथील भू अमृत गांडूळ खताच्या प्रकल्पाला भेट देऊन गांडूळ खत निर्मिती प्रकल्प त्याचे फायदे पर्यावरणास पूरक माहिती बाबाराव पडोळे यांच्या मुलाखतीतून घेतली. बाबाराव पडोळे यांनी रासायनिक खतापेक्षा गांडूळ खतामुळे उत्पन्न तर वाढतेच, जमिनीची सुपीकता वाढते असे सांगितले तसेच सर्वांना गांडूळ खत वापरण्याचे आवाहन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी राष्ट्रवादीचे नेते जीवन घोगरे विरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ मार्च-**

वसतिगृहाच्या थकीत शुल्कासाठी त्रास दिल्यामुळे हडको येथील पद्मश्री शामरावजी कदम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमधील बीएचएमएस द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या आकांक्षा गायकवाड या २५ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी हॉस्टेलचालक तथा राष्ट्रवादीचे नेते जीवन पाटील घोगरे यांच्याविरुद्ध अँट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदेडमध्ये हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांची असुरक्षितता आता पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे




नवीन नांदेडातील वाजेगाव येथील आकांक्षा मुंजाजीराव गायकवाड ही विद्यार्थिनी हडको येथील पद्मश्री शामराव कदम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला बीएचएमएस या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. ती हाडको येथील जीवन घोगरेंच्या घरी असलेल्या हॉस्टेलवर राहत होती. या हॉस्टेलसाठी तिच्याकडून दरमहा अडीच हजार रुपये घेतले जात होते. गेल्या एक वर्षापासून आकांक्षा गायकवाड त्या वसतिगृहात राहत होती. दि. ६ मार्च रोजी आकांक्षा ही हॉस्टेलमध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. पालकांनी मात्र या प्रकरणात हॉस्टेल चालकाविरुद्ध वेगवेगळे आरोप केले आहेत. आकांक्षाने स्वतःहून फाशी घेतल्याचे दिसत नव्हते. आपली मुलगी फाशी घेणारी नव्हती तर ती परिस्थिती सोबत लढून शिक्षण घेणारी होती, असा दावाही पालकांनी केला आहे. घटनेच्या ठिकाणी आकांक्षाच्या पायाला लागेल एवढ्या अंतरावर बेड होता. त्यामुळे मुलीने फाशी घेतल्याचा बनाव कुणीतरी केला असल्याचेही पालकाने तक्रारीत म्हटले आहे.

दुसरीकडे गेल्या आठ ते दहा महिन्यापासून आकांक्षाने वसतिगृहाची फीस दिली नव्हती. त्यामुळे वसतिगृहाचे मालक जीवन घोगरेंकडून तिला पैसे भर म्हणून त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळूनच आकांक्षाने आत्महत्या केल्याचा आरोप मुलीच्या पित्याने केला आहे. अनुसूचित जाती-जमातीची मुलगी असल्याचे माहित असूनही जीवन घोगरेने त्रास देऊन आकांक्षाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपावरून राष्ट्रवादीचे नेते जीवन घोगरेविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या हॉस्टेल चालविले जात आहेत. यामध्ये राजकीय मंडळीसह व्यावसायिकही मोठ्या प्रमाणात उतरले आहेत. त्याचवेळी खाजगी अभ्यासिकेच्या नावानेही विद्यार्थ्यांची मोठी लूट होत आहे. या वसतिगृहात विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. एकाच खोलीत अथवा हॉलमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी

ठेवले जात आहेत. त्यात विद्यार्थिनींची कुचंबना ही मोठ्या प्रमाणात होत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. खाजगी हॉस्टेलमध्ये असलेल्या मुलींना मानसिक त्रास दिला जात आहे. त्यात शुल्कासह इतर बाबींचाही समावेश असल्याचा आरोप अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. नांदेड जिल्हाभरात असलेल्या हॉस्टेलमधील सुविधांची पाहणी प्रशासनाने करावी अशी मागणीही करण्यात आली आहे.

# अंबाडी घाटातील 'आशियाना' कात टाकणार



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ७ मार्च-**

किनवट ते मांडवी-आदिलाबाद मार्गावरील अंबाडी घाटात असलेल्या वन विकास महामंडळाच्या 'आशियाना डेपो' इमारतीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी स्थानिक नागरिक आग्रही झाले आहेत. निसर्गरम्य परिसरात असलेल्या या वास्तूची वेळीच दुरुस्ती झाल्यास हे ठिकाण भविष्यात उत्तम पर्यटन केंद्र म्हणून नावारूपास येऊ शकते.

एकेकाळी प्रवाशांसाठी आणि मजुरांसाठी हक्काचा विसावा असणारी ही इमारत सध्या दुर्लक्षित आहे. या इमारतीची दुरुस्ती करून परिसराचे सुशोभीकरण केल्यास पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असे मत किसन राठोड, प्रेमसिंग जाधव ,किशन गेडाम आणि विठ्ठल गेडाम या स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे. शासनाने या वास्तूकडे लक्ष देऊन या परिसराचा कायापालट करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अंबाडी घाटातील हा परिसर निसर्ग सौंदर्याने नटलेला असून जवळच 'जंगो रायताड दायी' हे आदिवासी बांधवांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांची आणि पर्यटकांची संख्या मोठी असते. या इमारतीचा उपयोग विश्रामगृहासारखा झाल्यास माहूर, किनवट आणि तेलंगणा सीमावर्ती भागातून येणाऱ्या लोकांसाठी मोठी सोय होईल.

**भविष्यात येथे जळाऊ डेपो करण्याचे नियोजन : एस.एल. राठोड**

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात येथे जळाऊ डेपो करण्याचे नियोजन आहे. त्या अनुषंगाने इमारतीची दुरुस्ती आणि नियमित देखभाल करण्याबाबत पावले उचलली जातील. अशी माहीती वन परिक्षेत्र अधिकारी एस.एल. राठोड यांनी दिली.

## तुकाराम तुकाराम नावाच्या जयघोषात सदेह वैकुंठ गमन सोहळ्याची सांगता

**सोनखेड**-सोनखेड येथे सात दिवसापासून सुरु असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळा म्हणजे बिजोत्सव सोहळ्याची सांगता आज हभप गुरुराज महाराज देगलूरकर यांच्या



काल्याच्या कीर्तनाने झाली. काल दि ५ रोजी वार बुधवारी गुलालचे कीर्तन हभप पद्मनाभ महाराज व्यास यांचे कीर्तन झाले या सोहळ्यास सोनखेड व परिसरातील अंदाजे वीस हजार भाविक यांनी हा सोहळा याची देही याची डोळा अनुभवला व नंतर लगेच महाप्रसादाचा सगळ्यांनी लाभ घेतला तुकोबाराय यांच्या सोहळ्यास गुलाल उधळण्यासाठी अनेक राजकीय पक्षातील मान्यवर उपस्थित होते यावेळी माजी आमदार मोहनराव अण्णा हंबर्डे, प्रवीण पाटील चिखलीकर, गोदावरी अर्बन चे संचालक सदाशिव मामा पुंड, सोनखेड पोलीस ठाण्याचे सपोनि पांडुरंग माने पीएसआय वैशाली कांबळे सोबत पोलीस जमादार गंगाधरराव शिंदे गोपनीय शाखेचे रमेश वाघमारे व सर्व पोलीस कर्मचारी यांनी या सोहळ्यास उपस्थित होते तसेंच एक दिवस अगोदर या संपूर्ण सोहळ्यास उपविभागीय अधिकारी प्रवीणकुमार नरवटे तहसीलदार विठ्ठल परळीकर, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी भेट देऊन सर्व पाहणी करून श्री तुकोबाराय यांचे दर्शन घेतले. व आज दिनांक ६ रोजी काल्याच्या कीर्तनाने सप्ताह ची सांगता झाली यावेळी श्री तुकाराम महाराज संस्थान व बिजोत्सव समितीने चोख नियोजन करून कार्यक्रम यशस्वी पार पडला यावेळी सर्व सोनखेड येथील तरुण व भाविक यांनी परिश्रम घेतले

# विश्व हिंदू परिषदेच्या वतीने ओळख पंचांगाची कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ मार्च-**

विश्व हिंदू परिषद, मंदिर तथा अर्चक पुरोहित आयाम नांदेड व रेणुकाई प्रतिष्ठाणच्या संयुक्त विद्यमाने दि.१० मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता रेणूका मंदिर वामननगर येथे ओळख पंचांगाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेस वेदमुर्ती मनोज गुरु जोशी मार्गदर्शन करणार आहेत तर डॉ.अशोक संतान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. अर्चक पुरोहिम आयामचे देवगिरी प्रांत सहप्रमुख दादेश राठीकर, यज्ञेश्वर लाठकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहन भास्कर उंचाडकर, अमोल कंढारकर, विनायक सरदेशपांडे, सचिन भायेकर, विजय गोळेगावकर तसेच विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ.रविकुमार चटलावार, जिल्हामंत्री राजकुमार गोडसे, जिल्हा सहमंत्री गणेश कोकुलवार यांनी केले आहे. तसेच दि.८ मार्च रोजी दत्त मंदिर लोकमित्र नगर कॅनॉल रोड येथे सायंकाळी पाच वाजता हिंदू नववर्षाच्या स्वागतानिमित्त फेटा बांधणे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात प्रसिध्द फेटेवाले हेमंतसिंह मदनसिंह राजपूत हे प्रशिक्षण देणार असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेच्या वतीने देण्यात आली.

# बाबा सोनापीर उर्साला उत्साहात सुरुवात; हजारो भाविकांच्या उपस्थितीत पवित्र संदल !

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ७ मार्च-**

माहूर शहरातील सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे मोठ्या भक्ती भावात साजरा होणाऱ्या उर्साला सालाबादप्रमाणे यंदाही दि. मार्च रोजी मोठ्या भक्तिभावाने उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली असून, दुपारनंतर परचम कुशाइ ध्वजारोहण झाल्यानंतर दर्गाहचे मुतवल्ली मुजावर शेख बाबर अहमद फकीर मोहम्मद तसेच सज्जादा नशीन साजिद ऊल्लाह जागीरदार यांचेसह हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत बाबा सोनापीर दर्गाह मधील पवित्र मजारवर संदलसह पवित्र चादर अर्पण करण्यात आली.



दरवर्षी पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात लाखो भाविक हजेरी लावतात. यावर्षी मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिना सध्या सुरू असल्याने दररोज सायंकाळी समाजासह सर्वधर्मीय भाविकांची दर्गा येथे बाबांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होत आहे.संदलच्या दिवशीही हजारो भाविकांनी संदलमध्ये सहभागी होऊन उर्सात आलेले आकाश पाळणे, झुले ,लहान मुलांना खेळण्याच्या विविध कलाकृतीसह शीत पेयांचे स्टॉल्स, हॉटेल नाश्ता, कपडे व इतर साहित्य मिळण्याचे स्टॉल्स लागल्याने आलेल्या भाविकांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करत बालगोपालांसोबत आनंदोत्सव साजरा केला. पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात कुठलीही अनुचित घटना घडू नये म्हणून तहसीलदार अभिजीत जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे,, मुख्याधिकारी विवेक कांदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश माचेवार,वैद्यकीय अधीक्षक ओमप्रकाश साबळे, मराविवीकंचे अभियंता राहुल शेंडे, नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी, सपोनि शरद घोडके,पोउपनि संदीप अन्येबोईनवाड, पोउपनि पालसिंग ब्राह्मण, पोऊपनि बाबू जाधव यांचेसह पोलीस, होमगार्ड कर्मचारी बारकाईने लक्ष देऊन चोख बंदोबस्त ठेवत आहेत. तर व्यवस्थापन समितीचे मुतवली मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद, सज्जादानशीन साजिद उल्लाह जागीरदार तसेच आर्णी येथील अकबर भाई,अब्दुल जब्बार भाई, इलियास बावाणी,मनोज कीर्तने, सय्यद झहीर भाई यांचेसह शहर परिसरातील मान्यवर मंडळी सहकार्य करीत आहेत.

## आदमपूर हर्ष इंग्लिश स्कूलचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील हर्ष इंग्लिश स्कूल चा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम शुक्रवार दि.६ मार्च रोजी



गावातील शिवालय मंदिर परिसरात सायंकाळी उत्साहात संपन्न झाला.

प्रथमतः संस्थेचे व कार्यक्रम अध्यक्ष माजी व्हाईस चेअरमन तथा व्यावसायिक बालाजी डुब्बेवार सावकार यांच्यासह उपस्थित मान्यवरांकडून सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमातदेशभक्तीपर, शेतकरी, ऐतिहासिक,ग्रामीण परंपरा, गवळण,बालगीत,हिंदी-मराठी चित्रपटातील जुन्या व नव्या गाण्यांवरती चिमुकल्या मुलांनी बहारदार नृत्य करीत गावकरी रसिक व पालकांकडून रोख बक्षीस मिळवत प्रोत्साहनरूपी टाळ्यांच्या स्वरूपात शाबासकी मिळविली आहे. यावेळी कार्यक्रम अध्यक्ष बालाजी डुब्बेवार,शाळेचे मुख्याध्यापक गौतम भेदेकर,माणिकराव पाटील, महाराष्ट्र ग्रामीण बँक सहाय्यक महमदरफी मदार,ग्रामपंचायत पंप ऑपरेटर राम हालबुर्गे, शिक्षक विश्वजीत गायकवाड, शिक्षिका राहू योगेश भुरे, नितीश हालबुर्गे,आनंद इंगळे, चंद्रकांत गायकवाड,बालाजी नागेश्वर,मन्मथअप्पा मठपती, दैशोन्नती पत्रकार काशिनाथ वाघमारे,तरूण भारत पत्रकार जाफर आदमपूरकर,नागनाथ लमले,दिनकर कोळनुरे, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक,विद्यार्थी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## चुडावा येथे तुकाराम महाराज बीज साजरी

**चुडावा**-चुडावा ते श्री मंहत जमनादास महाराज संस्थान येथे श्री महंत जिवनदास महाराज याच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार ५ मार्च रोजी



तुकाराम महाराज बीज साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी तुकाराम महाराज यांच्या मुर्तीचा अभिषेक करण्यात आला. गुरुवारी सकाळी अकरा वाजता भजन गाथा भजन करण्यात आले. यावेळी ह. भ. प केशव पांचाळ महाराज यांनी प्रवचन केले. या प्रसंगी देविदास देसाई, श्रीरंग देसाई, सुभाष खल्लाळ संभाजी देसाई, प्रकाश देसाई, प्रेम देसाई, चंद्रकला देसाई, कांताबाई देसाई, शोभा देसाई, दारकाबाई कपाटे, शारदा देसाई, पुजा देसाई आदींसह गावकरी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती.

## आम्रपाली मादळे यांना राज्यस्तरीय सन्मान

**नांदेड**-राज्य परिवहन महामंडळ नांदेड विभाग नांदेड अंतर्गत नांदेड आगारात वाहक या पदावर गेल्या वीस वर्षापासून कार्यरत असणाऱ्या आम्रपाली संभाजी मादळे- कदम यांना जागतिक महिला दिनाचे औचित्य



साधून कामगार क्षेत्रात भरिव योगदान दिल्याबद्दल राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, १०१३, शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, पुणे येथे संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमात कामगार, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रतील विशेष उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय सन्मान समारंभपूर्वक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. सदर सोहळा शिक्षण संजीवनी या शैक्षणिक मासिकाचे मुख्य संपादक देविदास लिमये, कार्यकारी संपादक डॉ. संजय जगताप यांनी आयोजित केला आहे. आम्रपाली मादळे-कदम यांना यापूर्वी जनसंवाद उत्कृष्ट वाहक पुरस्काराने गौरवण्यात आले असून त्यांचे नांदेड आकाशवाणी केंद्रावरून भाषण देखिल प्रसारीत झाले आहे. प्रासंगिक लेखन प्रसिद्ध असून त्या सामाजिक क्षेत्रात आणि कामगारवर्गात महिलांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत असतात. सेवा कार्यकाळात कर्तव्यावर अद्याप एकही केस नाही हीच खरी त्यांच्या पारदर्शक कार्याची ओळख आहे. सदर सन्मानाबद्दल ए.डी. जमदाडे, माया गायकवाड, वैशाली कौठकर, माया थोरात, आशा पुष्पूलवार, राजश्री कल्याणकर, वर्षा हनवते आर्दीनी अभिनंदन केले आहे.

# सिडको येथे तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ मार्च-**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार दिनांक ६ मार्च २०२६ रोजी सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात मोठ्या उत्साहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांच्यावतीने साजरी करण्यात आली. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्ध अभिषेक व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

सिडको येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने दिनांक ६ मार्च रोजी तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शिवाजी महाराज पुतळ्याचा दुग्ध अभिषेक करण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील हजारो नागरिकांनी या अन्नदान भोजनाचा लाभ घेतला. तत्पूर्वी शिवसेना पदाधिकारी



यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन शिवसेना सिडको शहर प्रमुख जितूसिंग टाक यांनी केले होते. तर यावेळी शिवसेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख भुजंग पाटील डक, महानगर प्रमुख प्रकाश मारावा, नवज्योतसिंग सिद्धू गाडीवाले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अविनाश देशमुख, कामगार सेना जिल्हाप्रमुख ब्रिजलाल उगवे, माजी शहरप्रमुख निवृत्ती जिंकलवाड विधानसभा संघटक तुकाराम पांचाळ, प्रमोद मेड, संदीप जिलेवाड, अरुण पांचाळ यांची उपस्थिती होती तर शिवसेनेचे ज्येष्ठ पदाधिकारी निळकंठ काळे, शाखाप्रमुख सोनू नवघरे, सुरज फटाले, शिवाजी सूर्यवंशी, संजय साबणे, बाळू पंडित, नरेश राठी आदींची उपस्थिती होती.

# मुदखेड तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ७ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' मुदखेड तालुक्यातील विविध महसूल मंडळात आयोजित करण्यात आले असून या शिबिराच्या माध्यमातून प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न तालुक्यातील गरजू शेतकरी व नागरिकांच्या तक्रारी आणि प्रलंबित कामाचा निपटारा करण्यात येणार आहे या शिबिरात विविध दाखल्यांचे तात्काळ वाटप जातीचे दाखले, डोमिसाईल आणि नॉन क्रिमिलेअर, यांसारखी महत्त्वाचे कागदपत्रे पात्र लाभार्थ्यांना जागेवरच प्रदान करण्यात येणार असून या शिबिराचा तालुक्यातील गरजू नागरिक व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार डॉ.आनंद देऊळगावकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. या शिबिराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतजमिनी विषयक फेरफार व सातबारा दुरुस्ती,अनेक वर्षापासून जमिनीचे फेरफार वारस नोंदी आणि सातबारा उताऱ्यावरील चुका दुरुस्त, करण्यासह आयुष्यमान कार्ड डेटा एन्ट्री, भूमी अभिलेख, पंचायत समिती, कृषी विभाग, दुय्यम निबंधक, वन विभाग,आरोग्य विभाग व पशुसंवर्धन या कार्यालयातील प्रकरणे करण्याबाबतच्या अर्जावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन सदरील प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहेत .



शिबिर टप्पा क्र. ०१ ची अंमलबजावणी करण्याबाबत कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दिनांक १८/०२/२०२६ रोजीच्या निर्देशान्वये तालुक्यात येथे दि. ०७ मार्च ते १५ मे या कालावधीत सदर महाराज अभियानांतर्गत पुढीलप्रमाणे शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरांचे तालुक्यात खालील प्रमाणे राबविण्यात येणार आहे. दि.७ मार्च ग्रामपंचायत कार्यालय, बारड येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत., दि.१४ मार्च ग्रामपंचायत कार्यालय, मुगट येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत, दि.१० एप्रिल हनुमान मंदिर कार्यालय, निवघा येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत, दि.१७ एप्रिल हनुमान मंदिर, माळकौठा येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत, दि.८ मे तहसील कार्यालय, मुदखेड येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत, दि.१५ मे ग्रामपंचायत कार्यालय, मेंडका येथे सकाळी १० ते दुपारी ०२ पर्यंत.

या शिबिरासाठी मुदखेड चे तहसीलदार, नायब तहसीलदार, संबंधित मंडळाचे मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत., तरी या शिबिराचा सर्व तालुक्यातील लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉक्टर आनंद देऊळगावकर यांनी शासनाच्या या महाराजस्व अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या शिबिराच्या अनुषंगाने केले आहे.

# शेतमजुरांनाही अपघात विमा योजनेचा लाभ; आ. कोहळीकर यांच्या मागणीला यश

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ मार्च-**

राज्यातील शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासाठी सुरू असलेल्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनाच्या धर्तीवर आपदग्रस्त शेतमजुरांच्या कुटुंबांनाही मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शेतमजूर मृत्युमुखी पडल्यास त्यांच्या कुटुंबाला २ लाख रुपयांचे आर्थिक सहकार्य देण्याचा निर्णय महायुती सरकारने मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केला.

या निर्णयामुळे राज्यातील अपघातग्रस्त शेतमजूर कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून ही मागणी बाबूराव कदम कोहळीकर, आमदार हदगाव (जि. नांदेड) यांनी सातत्याने मांडली होती. नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र हिवाळी अधिवेशन २०२५ दरम्यान आमदार कदम यांनी विधानसभेत ही मागणी जोरदारपणे उपस्थित केली होती.



शेतकरी अपघातात मृत्युमुखी पडल्यास त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळते; मात्र शेतीतच कष्ट करणारे शेतमजूर अशा संरक्षणापासून वंचित राहतात, ही बाब लक्षात घेऊन शेतमजुरांनाही त्याच धर्तीवर विमा संरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली होती. या मागणीचा सकारात्मक विचार करत राज्य सरकारने आता शेतमजुरांच्या कुटुंबालाही २ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबत माध्यमांशी बोलताना आमदार बाबूराव कदम कोहळीकर म्हणाले की, राज्यातील शेती व्यवस्थेत शेतकरी आणि शेतमजूर हे दोन्ही घटक तितकेच महत्त्वाचे आहेत. शेतमजूर कुटुंबांवर एखादी दुर्घटना ओढवली तर त्यांना कोणताही आधार राहत नाही. त्यामुळे शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत दिलासादायक असून यामुळे अपघातग्रस्त झालेले शेतमजूराच्या नातेवाईकांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकरी आणि शेतमजूर हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कणा आहेत. त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी सरकारने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह आहे. राज्यातील अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबांना याचा निश्चितच फायदा होईल.

दरम्यान, या निर्णयामुळे राज्यातील शेतमजूर वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून सदर मागणी राज्यातून आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांना शासनाच्या लक्षात आणून देऊन ही मागणी मार्गी लागल्याची समाधान जनतेत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

Shri Gyan Saraswati Educational & Welfare Society, Nanded

**Swami Vivekananda Vidya Vihar, Barhali,**

TQ. Mukhed Dist. Nanded

**WANTED**

For the academic year 2026-27 required following teachers category in our school.

| Sr. No. | Subject Name | Qualifaction | Vaccancies |
|---|---|---|---|
| 1. | Pre Primary | B.A. / B.SC. | 05 |
| 2. | English - 1st to 4th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 3. | Maths and Science - 1st to 4th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 04 |
| 4. | English - 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 5. | Marathi 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 6. | Hindi - 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 7. | Maths - 5th to 8th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 02 |
| 8. | Science - 5th to 8th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 02 |
| 9. | Social Science - 6th to 10th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 10. | Physical education - 5th to 10th | B.P.ED. / M.P.ED. | 02 |

Interested Candidates should contact us on the number given below or send RESUME on the number given below.

- Experienced candidate will given preference.
- Better command in English language
- Monthly mindful salary.
- Demo class will conduct before appointment.
- Accomdation as per need.

CONTACT : 86985 15809 / 90963 10390

## थोडक्यात...

### ८ वा पशु विकास दिन यशस्वीरीत्या पूर्ण

**मुंबई :** भारतातील अग्रगण्य एनबीएफसींपैकी एक असलेल्या एसएमएफजी इंडिया क्रेडिटने १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या प्रमुख पशुधन कल्याण आणि ग्रामीण उपजीविका उपक्रमाचा ८ वा पशु विकास दिन यशस्वीरीत्या पूर्ण केला. 'सर्वोत्तम सेवा: पशु, परिवार आणि प्रगती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाने पशुधनाचे आरोग्य, कुटुंबाचे कल्याण आणि शाश्र्वत प्रगती यांना बळकटी देत सर्वांगीण ग्रामीण विकासाबाबत संस्थेची बांधिलकी अधिक दृढ केली.

### प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) ची घोषणा केली

**मुंबई :** स्टेनलेस-स्टील उत्पादन क्षेत्रात तीन दशकांहून अधिक अनुभव असलेली आघाडीची कंपनी राजपुताना स्टेनलेस लिमिटेडने अधिकृतपणे त्यांच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) ची घोषणा केली आहे. या आयपीओद्वारे भांडवली बाजारातून अंदाजे २५४.९८ कोटी रुपये उभारण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. आयपीओ तपशील - राजपुताना स्टेनलेसचा आयपीओ ९ मार्च २०२६ (सोमवार) रोजी गुंतवणुकीसाठी खुला होईल आणि ११ मार्च २०२६ (बुधवार) रोजी बंद होईल.

### मोटोरोला एज ७० फ्यूजन लाँच

**नाशिक :** मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान व नाविन्यतेमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटोरोला एज ७० फ्यूजन लाँच केला, ज्यासह मिड-प्रीमियम स्मार्टफोन श्रेणीमध्ये उल्लेखनीय कॅमेरा नाविन्यता, सर्वोत्तम व्हिज्युअल्स आणि नेक्स्ट-जनरेशन ऑन-डिवाईस एआय आणले आहे. या डिवाईसमध्ये जगातील पहिला ५० मेगापिक्सल सोनी-एलवायटी ७१० कॅमेरासह मोटोएआय आहे, जो अंधुक प्रकाशात देखील सुस्पष्टता, ब्लर-फ्री फोटोज, पॅन्टोन'द्वारे सत्यापित १०० टक्के ट्रू कलर्स व स्किनटोन्स आणि सर्व लेन्सेसमध्ये ४के व्हिडिओ रेकॉर्डिंग देतो.

### विवोने वी ७० आणि वी७० एलिटसाठी नवीन मोहीम सुरू

**पुणे :** विवो इंडियाने विवोवी७० आणि विवो वी७० एलिटसाठी एक नवीन डिजिटल व्हिडिओ मोहीम सुरू केली आहे, ज्यामध्ये ब्रँड ॲम्बेसेडर सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांचा समावेश आहे. हा चित्रपट जीवनातील सर्वात आनंदी आणि सर्वात संस्मरणीय क्षण साजरे करतो आणि ग्राहकांना त्यांच्या सर्वात मौल्यवान आठवणी स्पष्टतेने आणि भावनेने टिपण्यास सक्षम करण्याच्या विवोच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकतो.

### महिला कमी वयात आरोग्य विमा खरेदी करत आहेत

**नवी दिल्ली:** आंतरराष्ट्रीय महिला दिनापूर्वी, निवा बुपा हेल्थ इन्शुरन्सने त्यांच्या पॉलिसीधारक आणि दाव्यांच्या डेटावर आधारित महत्त्वाचे अंतर्दृष्टी शेअर केली आहे, जे दर्शविते की भारतातील महिला आरोग्य संरक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलत आहेत.या विश्र्लेषणानुसार, महिला आता कमी वयात आरोग्य विमा खरेदी करत आहेत आणि आरोग्याशी संबंधित आर्थिक निर्णयांमध्ये अधिक सक्रिय भूमिका बजावत आहेत. हा बदल विशेषतः बिगर महानगरे बाजारपेठांमध्ये दिसून येतो, जिथे महिलांमध्ये आरोग्य विम्याची जागरूकता आणि स्वीकार सातत्याने वाढत आहे.

### बहुसंख्य महिला आता स्वतंत्र गुंतवणूक निर्णय घेतात

**मुंबई :** डीएसपी म्युच्युअल फंडाने युगव्ह संस्थेच्या सहकार्याने 'डीएसपी विनव्हेस्टर पल्स २०२५-२६' हा संशोधनात्मक अहवाल प्रसिद्ध केला आहे. तब्बल तेरा शहरांमध्ये ५,०५० गुंतवणूकदारांच्या या देशव्यापी सर्वेक्षणातून भारताच्या गुंतवणूक क्षेत्रातील एका मोठ्या बदलाचे चित्र या अहवालातून नजरेसमोर आले आहे. महिला आता त्यांच्या आर्थिक निर्णयांची जबाबदारी पुर्वीच्या तुलनेत अधिक प्रमाणात स्वतः घेताना दिसत आहेत, मात्र दुसरीकडे गुंतवणूकदारांचा आत्मविश्र्वास आणि सुनियोजित आर्थिक नियोजन यांच्यातील दरी अधिक रुंदावत चालल्याचा मुद्दाही प्रकाशझोतात आला आहे.

### लग्नपंचमीला प्रचंड प्रतिसाद

**महाराष्ट्र :** मराठी रंगभूमीवरची सर्जनशील, बहुमुखी कलावंत मधुगंधा कुलकर्णी आणि निपुण धर्माधिकारी यांचे अनुक्रमे लेखन-दिग्दर्शन आणि स्वप्नील जोशी, अमृता खानविलकर यांच्या भूमिका असलेल्या 'लग्नपंचमी'ला महाराष्ट्रात भरभरून प्रतिसाद मिळाला आणि दोन महिन्यात त्याचे २५ प्रयोग झालेसुद्धा. या रजतमहोत्सवी प्रयोगाच्या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनी या नाटकाच्या निर्मात्यांनी नाटकाचा 'वर्ल्ड टूर' अर्थात परदेश दौरा जाहीर केला असून तो अशाप्रकारचा मराठी नाटकाचा पहिलाच परदेश दौरा असणार आहे.

### झी टीव्हीच्या अभिनेत्रींकडून महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त झी टीव्हीवरील अग्रणी अभिनेत्रींकडून स्त्रीशक्ती, जिद्द आणि स्वप्नांचा गौरव करण्यात आला. 'गंगा माई की बेटियाँ'मधील अमनदीप सिधू, 'जगद्धात्री'मधील सोनाक्षी बत्रा, 'जाने अनजाने हम मिले'मधील आयुषी खुराणा, 'तुम से तुम तक'मधील निहारिका चौक्सी, 'सरू'मधील मोहक मटकर, 'लक्ष्मी निवास'मधील अक्षिता मुद्गल आणि 'वसुधा'मधील प्रिया ठाकूर यांनी स्त्री असण्याचा अभिमान व्यक्त करत महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला. समाजात महिलांना सुरक्षितता, सन्मान आणि समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कुटुंबाचा पाठिंबा, आत्मविश्र्वास आणि जिद्दीच्या जोरावर महिला कोणतेही स्वप्न पूर्ण करू शकतात, असा संदेश त्यांनी महिला दिनानिमित्त दिला.

# नाथषष्टी यात्रेसाठी प्रशासन अलर्ट मोडवर, मुख्याधिकारी अंभोरे यांची वाळवंट पाहणी

**तभा वृत्तसेवा/मंगलसिंह भवरे**

**पैठण, दि. ०७ मार्च :** ९ मार्च ते ११ मार्च असा मुख्य उत्सव असलेल्या संत एकनाथ महाराज नाथषष्टी यात्रेसाठी प्रशासनान सज्ज झाले असून पैठण नगर परिषद मुख्याधिकारी डॉ, पल्लवी अंभोरे,नगराध्यक्षा विद्या कावसनकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी यात्रा भरणाऱ्या गोदावरी वाळवंट, यात्रा मैदान,मुख्य नाथ मंदिरासह परिसर,दक्षिण काशी मैदानाला भेटी देऊन तेथील परिस्थिती जाणून घेत कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या.



लाखो वैष्णव भक्तांची मांदीयाळी असणाऱ्या नाथषष्टी यात्रा उत्सवासाठी फड बांधणीला वेग आला असून आतापासूनच पैठणनगरीत भक्तांचे आगमन होत आहे.आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी भक्तांच्या सुविधेत अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे अशी सूचना मिळताच प्रशासनाच्या वतीने खास खबरदारी घेतल्या जात आहेत.जागोगागी पिण्याचे पाणी मोबाईल टॉयलेट,स्वच्छता, पोलीस बंदोबस्त, सिसिटीव्ही कॅमेरे,ध्वनीक्षेपण, वाहन पार्किंग व्यवस्था, आरोग्य पथक आदी सुविधे बाबत मंदिर कमानी समोर खास कंट्रोलरूमची उभारणी करण्यात आली आहे.याठिकाणी उप मुख्याधिकारी नागेश खोडवे, उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे,अभियंता पंकज पवार,धर्मराज उजगिरे, प्रमुख व्यंकटी पापुलवार,अशोक मगरे,अश्र्विन गोजरे, ललित महाजन संकेत तांगडे, सौरभ हलमारे,तुषार वाकले, दिलीप लांडगे,अशोक पगारे,अमोल शेजूळ सह कर्मचारी उपस्थित होते.

**पवित्र रांजण भरला**

श्री संत एकनाथ महाराजांच्या वाड्यातील भगवान श्रीकृष्ण परमात्म्याने १२ वर्षे श्रीखंड्याचे रूप धारण करून गोदावरीचे पाणी ज्या पवित्र रांजणात भरण्याचे कार्य केले. तो रांजण शनिवारी सकाळी ७:५० वाजता श्री संतोष विठ्ठलराव कुलकर्णी ( रा. लिंबूर ता. मदनुर जिल्हा कामारेठी) यांच्या घागरीने भरला.

नाथवंशज तसेच सालकरी श्री ह. भ. प. रघुनाथबुवा नारायणबुवा गोसावी पालखीवाले यांनी संतोष कुलकर्णी यांचे श्रीखंड्या (श्रीकृष्ण) म्हणून पुजन केले.दोन दिवसांपूर्वी तुकाराम बीजेला हा रांजण पूजन करून नाथषष्टीचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला होता.रविवारी नाथ वंशज्यांच्या वतीने लक्ष्मी आई मंदिर तसेच दिंडी प्रमुखांना अक्षदा देऊन नाथषष्टी यात्रा सोहळ्याचे आमंत्रण देण्यात येणार तर सोमवारी सकाळी गावांतील नाथ मंदिर ते नाथ समाधी मंदिर अशी निर्यान दिंडी निघणार आहे.

**पोलिसांचा तगडा बंदोबस्त**

नाथषष्टी यात्रा निमित्त पैठण येथे लावण्यात येणाऱ्या पोलीस बंदोस्तात १ दंगा काबू पथक,१ डी.वाय.एस.पी, २ पोलीस निरीक्षक, ४० सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४२१ पोलीस अंमलदार, १७८ होमगार्ड, ३०० पोलीस मित्र असा जवळपास १ हजार कर्मचाऱ्यांचा समावेश राहणार आहे.

**वाहतूकीत बदल**

पैठण शहरांमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या मार्गामध्ये संभाजीनगर मार्गे तसेच पाचोड मार्गे पैठण मध्ये येणाऱ्या भाविकांसाठी सह्याद्री कॉर्नर येथे गार्डन दुर्गा हॉटेलच्या बाजूला पार्किंगची व्यवस्था केलेली आहे. शहागड रोड तसेच शेवगाव रोड या मार्गे पैठण शहरांमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी गोलनाका येते पार्किंगची व्यवस्था केली आहे.पैठण शहरांमध्ये असलेले बस स्थानक तात्पुरत्या स्वरूपामध्ये गोल नाका परिसरामध्ये स्थलांतरित करण्यात आलेले आहे.तहसील ऑफिस समोर वाहनासाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.अत्यावश्यक सेवेची, महत्वाचे व्यक्ती, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वाहन यांना पोलीस ठाणे मार्फत पास देण्यात आलेला आहे.सर्व भाविकांनी आपापले वाहन नमूद पार्किंग ठिकाणी पार्क करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.पैठण शहरातील सर्व नागरिक व व्यापारी यांना छत्रपती संभाजी नगर ग्रामीण पोलीस दला मार्फत आव्हान करण्यात येत आहे दिनांक ९ मार्च ते ११ मार्च यादरम्यान आपण आपली वाहने अत्यावश्यक असेल तरच सार्वजनिक ठिकाणी वापर करावा भाविकांची गैरसोय होईल असे कोणतेही वर्तन आपल्या कडून होऊ नये याची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले आहे.

**भक्तांसाठी ४०० च्या आसपास जादा बसेस**

नाथषष्टी यात्रेसाठी राज्य परिवहन मार्ग मंडळाच्या वतीने ४०० चे आसपास नाथषष्टीयात्रा स्पेशल जादा बसेसची व्यवस्था करण्यात आली असून या बसेश लगतच्या परिसरासह राज्यातील प्रमुख शहरातून पैठणला फेऱ्या करणार आहेत. भक्तांच्या सुविधेसाठी गोल नाका ( महावीर चौक ) खेटून असलेल्या शेखर पाटील यांच्या शेतात अतिरिक्त नवीन बसस्थानक तयार करण्यात आल्याने याठिकाणी पिण्याचे पाणी,मंडप व शौचालय व्यवस्था करण्यात आल्याची माहिती सहाय्यक वाहतूक निरीक्षक प्रमोद तांबे यांनी दिली.

## 'झुडिओ' फ्रँचायझीच्या नावाखाली व्यावसायिकाची १४ लाखांची फसवणूक

**सायबर पोलिसांच्या सतर्कतेमुळे ५.७७ लाख रुपये परत**



**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. ०७ मार्च :** सिल्लोड येथील व्यावसायिक फिरोज खान बिसमिल्ला खान यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये इंटरनेटवर 'झुडिओ' फ्रँचायझीसाठी शोध घेतला होता. यावेळी दोन संशयित व्यक्तींनी स्वतःला कंपनीचे अधिकारी भासवून नोंदणी शुल्क, शोरूम बांधकाम आणि फर्निचरच्या नावाखाली फिरोज खान यांच्याकडून १३,९९,५०० रुपये आरटीजीएसद्वारे उकळले. मात्र, शोरूमच्या कामासाठी टाळाटाळ होत असल्याने फिरोज खान यांनी मुंबईतील मुख्य कार्यालयात चौकशी केली असता आपली फसवणूक झाल्याचे त्यांना समजले.

याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्याकडे तक्रार प्राप्त होताच सायबर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. गुन्ह्यात वापरलेली बँक खाती आणि मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्र्लेषण करून पोलिसांनी ५ लाख ७७ हजार रुपयांचा निधी गोठवला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही रक्कम २५ फेब्रुवारी २०२६ रोजी फिरोज खान यांच्या खात्यात जमा करण्यात आली. आपली कष्टाची रक्कम परत मिळाल्याने त्यांनी सायबर पथकाचे आभार मानले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंह, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, सपोनि निशा बनसोड, विजयसिंग जोनवाल, कैलास कामठे, संतोष तांदळे, दत्ता तरटे, योगेश मोईम, गणेश घोरपडे, मुकेश वाघ, राजेश राठोड, शीतल खंडागळे, सविता जायभाये, रूपाली जाधव, अनिता पारधे व नंदा तायडे यांच्या पथकाने केली.

## महावितरण कार्यालयात लाईनमन दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०७ मार्च :** महावितरण कंपनीच्या बिडकीन उपविभाग कार्यालय येथे दि ४ ४ मार्च रोजी लाईनमन दिवस हा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.महावितरण कंपनीतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे लाईनमन हा लाईनमन सतत ग्राहकांना अग्रस्थानी ठेवून ऊन,वारा, पाऊस तसेच वादळे असो किंवा कोणत्याही सणवार असो यावेळी ग्राहकांना अति उत्तम सेवा देण्यासाठी लाईनमन हा तत्पर असतो.रात्री बे रात्री चोवीस तास वीज वाहिन्यांचे दोष (फॉल्ट) काढून व ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा देऊन ग्राहकांचे समाधान करत असतो.त्यावेळी लाईनमन हे जीवाची पर्वा न करता कोणत्याही परिस्थित ग्राहकाचा वीज पुरवठा सुरळीत करून देतो.त्यांच्या कामाचा कोठेतरी गुणगौरव व्हावा तसेच त्यांना महावितरण कंपनीच्या कामासाठी नवीन उत्साह मिळावा त्यासाठी शासन परिपत्रकानुसार आज महावितरण कंपनी बिडकीन उपविभाग यांच्या वतीने लाईनमन दिवस उत्साहात साजरा केला.याप्रसंगी भव्य रॅली चे आयोजन करण्यात येऊन ग्राहकांना आपली वीजबिले वेळेत भरण्यात यावी.जास्तीत जास्त स्मार्ट मीटर बसवून घेऊन विजेची व पैशांची बचत कशी होईल,कोणत्या कालावधीमध्ये किती वीज वापरली तर किती वीज दर लागेल,विजेच्या अपघातपासून स्वतःची, मुलाबाळांची व पाळीव प्राण्यांची कशी काळजी घ्यायला पाहिजे, याबाबत सदरील रॅलीत जागृती करण्यात आली.सदरील रॅली बिडकीण शहरातील संपूर्ण गल्ल्यांमध्ये फिरविण्यात आली.यावेळी बिडकीन मधील जिल्हापरिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य,सरपंच,उपसरपंच , ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी महावितरण कंपनीतील सर्व लाईनमन यांना लाईनमन दिवसाच्या निमित्त पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी मा.उपकार्यकारी अभियंता प्रकाश वाहुळे,सहाय्यक अभियंता,.विनय नांद्रे, अनील सौवर, बाळासाहेब बर्वे,विवेक जाधव,अमोल खंडागळे,राम बोबडे, सहाय्यक लेखापाल अंबादास पवार, मानव संसाधन विभागाचे उपव्यस्थापक शेख मुस्ताक,जितेंद्र हाडे, सोपान निळ,मुख्य तंत्रज्ञ अर्जुन गव्हाणे, रमेश जाधव,रमेश देवरे, विजय वीर, ऋषिकेश सोनवणे, योगेश जाधव,शंकर करताडे,संदीप चाटे,सचिन थोटे, आतिश नाडे, अनिरुद्ध गोर्डे,नामदेव शेळके, राधेश्याम सोलाटे, शेख आमजत,मनोज पाबळे,अमोल शेकटकर, भगवान बोंबले, कांचन क्षीरसागर, दिगंबर काळे,महेश बागडे, भूषण ठोंबरे,दीपक मुके यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी हजर होते. सदरील रॅली ची सांगता हॉटेल तृप्ती येथे सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन व सर्व लाईनमन यांचा सत्कार करून संपन्न झाली.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन शेख मुस्ताक यांनी केले.




## एमजीएममध्ये साजरी करण्यात आली पर्यावरणपूरक होळी



**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या मानव व संसाधन विभागाच्या वतीने विद्यापीठाच्या चिंतनगाह येथे पर्यावरणपूरक होळीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधितांनी फुलांच्या पाकळ्यांची उधळण करत पर्यावरणपूरक होळी साजरी केली.

यावेळी, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, मानव संसाधन विभागाच्या संचालिका टीना सहारन, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते. होळीनिमित्त येथे चित्रकलेसह रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी, होळीनिमित्त एमजीएम कृषी विज्ञान केंद्र, गांधेली येथे तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक रंगाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधितांना वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मानव व संसाधन विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागप्रमुख राजू सोनवणे आणि डॉ.योगिता महाजन यांनी केले. यावेळी विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रा.राहुल खरे, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी होळीविषयी गाणे सादर केली. त्यांना सतीश जोगदंड, गौरव ढोले, आदित्य कुलकर्णी यांनी साथसंगत दिली.



## कार्यालय नगर परिषद पैठण

Email munptn@gmail.com | दुरध्वनी नंबर ०२४३१-२२३०१०

जा.क्र.नपपै/यात्रा/कावि/२०२६/४७७ | दिनांक : ०६/०३/२०२६

### "जाहिर आवाहन"

पैठण शहरातील सर्व नागरीकांना व यात्रेकरुना सुचित केले जाते की, यात्रेच्या काळात ताप, सर्दी, खोकल्याचा संसर्ग होऊ नये म्हणुन खालील दक्षता व उपाययोजना करावी रोगाचा प्रसार व संसर्ग होणार नाही. यासाठी सहकार्य करावे.

१) तापेचा साथीचा उगम हा घरोघर साठवलेल्या पाण्याच्या माध्यमाने होत असतो त्या करीता दिर्घ काळातील साठवलेले पाणी काढून टाकावे व पाण्याचा हौद स्वच्छ करुन घ्यावा. पाणी गाळुन व उकळुन प्यावे.
२) यात्रेकरुने व पैठण शहरातील दुकानदाराने नगर परिषदेची परवानगी घेऊनच दुकाने लावावीत.
३) विक्रेत्यांनी विक्रीच्या ठिकाणी शिळे, उघडे अन्न व सडलेला भाजीपाला, फळे विक्रीसाठी ठेऊ नये अन्न पदार्थ झाकुन ठेवावेत.
४) गोदावरी नदीत पोहण्यास सक्त मनाई आहे.
५) गोदावरी नदीच्या पात्रात पाण्यासाठी खड्डे व झरे करुन पाणी पिण्यासाठी वापरु नये.
६) हॉटेल धारकांनी पिण्याचे पाणी साठविण्याचे हौद, रांजण, माठ इत्यादी दररोज स्वच्छ धुऊन घ्यावेत.
७) दुकानदारांनी केर कचरा, घाण रस्त्यावर टाकु नये आपला परिसर स्वच्छ ठेवावा.
८) नागरीकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा व पाण्याचे डबके तयार होऊ देऊ नयेत. साचलेले पाणी काढुन टाकावे व जंतु नाशक औषधाचा वापर करावा.
९) शहर स्वच्छतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.
१०) पाण्याचा अपव्यय टाळावा.
११) पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा.
१२) सार्वजनिक रस्ते, खुल्या जागा इत्यादी परिसर अस्वच्छ करु नये.
१३) नाल्यामध्ये केर कचरा टाकु नये.
१४) जनावर धारकांनी आप आपले जनावरे मोकाट फिरणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
१५) आरोग्याच्या दृष्टीकोणातुन काही माहिती, मदत किंवा मार्गदर्शन हवे असल्यास पैठण ग्रामिण (सरकारी रुग्णालय) विभागाशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पल्लवी अंभोरे)**
**मुख्याधिकारी, नगर परिषद पैठण**

स्वाक्षरीत/-
**(श्री. तुषार सुर्यभान पाटील)**
**उपाध्यक्ष,नगर परिषद पैठण**

स्वाक्षरीत/-
**(सौ. विद्या भुषण कावसानकर)**
**नगराध्यक्षा नगर परिषद पैठण**

**सर्व नगर परिषद सदस्य व कर्मचारी वृंद नगर परिषद पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर**